रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १८४
www.ramprahar.com

रविवार, १९ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राज्यातील पालकमंत्र्यांची यादी जाहीर; रायगडचे पालकमंत्रीपद आदिती तटकरेंकडे

**मुंबई** : राज्य सरकारकडून पालकमंत्र्यांची यादी शनिवारी (दि. १८) जाहीर करण्यात आली. गडचिरोलीचे पालकमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आले आहे. बीड आणि पुण्याचे पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे, तर मुंबई शहर आणि ठाण्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे देण्यात आली आहे. नागपूर व अमरावती चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर राधाकृष्ण विखे-पाटील, वाशिम हसन मुश्रीफ, सांगली चंद्रकांत पाटील, नाशिक गिरीश महाजन, पालघर गणेश नाईक, जळगाव गुलाबराव पाटील, यवतमाळ संजय राठोड, मुंबई उपनगर आशिष शेलार व मंगलप्रभात लोढा (सहपालकमंत्री), रत्नागिरी उदय सामंत, धुळे जयकुमार रावल, जालना पंकजा मुंडे, नांदेड अतुल सावे, चंद्रपूर अशोक उईके, सातारा शंभुराज देसाई, रायगड आदिती तटकरे, लातूर शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार माणिकराव कोकाटे, सोलापूर जयकुमार गोरे, हिंगोली नरहरी झिरवाळ, भंडारा संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर संजय शिरसाट, धाराशिव प्रताप सरनाईक, बुलडाणा मकरंद जाधव-पाटील, सिंधुदुर्ग नितेश राणे, अकोला आकाश फुंडकर, गोंदिया बाबासाहेब पाटील, कोल्हापूर प्रकाश आबिटकर व माधुरी मिसाळ (सहपालकमंत्री), गडचिरोली आशिष जैस्वाल (सहपालकमंत्री), वर्धा पंकज भोयर आणि परभणीचे पालकमंत्रीपद मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे देण्यात आले आहे.

# स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण होत आहेत. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. १८) सांगितले.





केंद्रीय ग्रामविकास व पंचायतराज मंत्रालयामार्फत पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ. सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकाजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वतःचे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४पासून आम्ही देशातील ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड वितरित करत आहोत. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. स्वामित्व योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टाचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. गावोगावी शौचालये, उज्ज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँडसोबत कॉमन सर्व्हिस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे पंतप्रधान मोदी या वेळी म्हणाले. (पान २ वर..)

# पात्रता निकषात न बसणाऱ्या चार हजार महिलांची लाडकी बहीण योजनेतून माघार

■ मंत्री आदिती तटकरे यांची माहिती



### रक्कम लोककल्याणासाठी वापरणार

सुमारे चार हजार महिलांनी लाडकी बहीण योजनेचा अर्ज परत केला. हा प्राथमिक आकडा असून कदाचित याहून अधिक अर्ज परत येतील, असे सांगून या संपूर्ण प्रक्रियेमध्ये सरकारी चलनच्या माध्यमातून रिफंड हेडच्या मदतीने हे पैसे राज्याच्या तिजोरीत परत येणार असून ती रक्कम लोककल्याणकारी कामांसाठी वापरली जाईल, असे मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यातील जवळपास अडीच कोटी महिलांना लाभ झाला, पण उत्पन्नमर्यादा अधिक असतानाही काहींनी या योजनेचा लाभ घेतला. यानंतर आता प्रशासनाने यामध्ये लक्ष घालत अर्जांची पुन:पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. याच पार्श्वभूमीवर पात्रता निकषात न बसणाऱ्या आतापर्यंत सुमारे चार हजार महिलांनी पडताळणी मोहीम राबवण्याच्या आधीच या योजनेतून माघार घेतली असल्याची माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी (दि. १८) दिली.

माध्यमांशी संवाद साधताना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, आम्ही दिलेल्या माहितीनुसार पाच बाबींवर लाडकी बहीण योजनेसाठीच्या अर्जांची पुन:पडताळणी सुरू आहे. जिथे अडीच लाखांहून अधिक कोणाचे उत्पन्न आहे अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे, त्यांच्या तक्रारी आल्या आहेत किंवा दुचाकी वाहनांच्या पलिकडे ज्यांच्याकडे चार चाकी वाहने आहेत त्यांच्यासंबंधीच्या तक्रारी आल्या होत्या. काही महिला लग्न होऊन इतर राज्यांमध्ये वास्तव्यास गेल्या आहेत अशा महिलांचे अर्जही आले आहेत की, आम्ही लाभासाठी पात्र नाही. दोन वेळा अर्ज दाखल केल्याच्याही तक्रारी आल्या होत्या. त्यातील बऱ्याच महिलांनी स्वत:हून लाभ परत देण्यास सुरुवात केली आहे. काही रक्कम डिसेंबर महिन्यात परत आली, काही जानेवारी महिन्यात परत येत आहे. सरकारी चलानच्या माध्यमातून ही संपूर्ण सरकारी प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

लाभासाठी पात्र नसल्याचे लक्षात येताच पुढाकार घेत राज्य शासनाचा निधी परत करण्याची प्रामाणिक भूमिका काही लाडक्या बहिणींनी घेतली आहे. त्यामुळे बहिणी लाडक्या आणि प्रामाणिकसुद्धा आहेत, असे मंत्री तटकरे यांनी म्हटले आहे.

लाडकी बहीण योजनेत नियमबाह्य पैसे घेतले असल्यास त्यांना त्या संदर्भात माहिती दिली जाईल आणि राज्य शासनाच्या तिजोरीत तो पैसा परत घेतला जाईल. यामध्ये सर्व अडीच कोटी लाभार्थी महिला लाभार्थ्यांची पूर्णपणे पुन:पडताळणी करणार नसल्याचे स्पष्ट करत मुळात एक लाखांहून कमी उत्पन्न असणाऱ्या जवळपास दीड कोटींहून अधिक जनतेचाही यामध्ये समावेश असल्यामुळे इथं पुन:पडताळणीचा मुद्दा उपस्थित होतच नाही, ही बाब मंत्री तटकरे यांनी अधोरेखित केली.

# कर्जतमध्ये विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपत

■ पक्षप्रवेश करणाऱ्यांचा निर्णय योग्य ठरेल -खासदार धैर्यशील पाटील



**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या २५ वर्षात पहिल्यांदा राज्यात भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक जागा जिंकता आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर नव्या दमाने भाजपमध्ये प्रवेश सुरू असून प्रवेशकर्त्यांचा निर्णय त्यांच्या राजकीय भवितव्य दृष्टीने योग्य ठरेल. तुम्ही आज प्रवेश केला आहे. त्यामुळे तुमच्या भविष्याची काळजी आता भाजपची आहे, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील पाटील यांनी केले.

माजी आमदार सुरेश लाड यांच्या जनसंपर्क कार्यालयात विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्या वेळी खासदार धैर्यशील पाटील बोलत होते.

या कार्यक्रमास माजी आमदार सुरेश लाड, भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस दीपक बेहेरे, उपाध्यक्ष वसंत भोईर, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरेश पाटील, तानाजी चव्हाण, विधानसभा मतदारसंघ प्रमुख किरण ठाकरे, सोशल मीडिया संयोजक अ‍ॅड. गायत्री परांजपे, कर्जतचे माजी नगराध्यक्ष शरद लाड, (पान २ वर..)

## सैफ अली खान हल्ल्याप्रकरणी संशयित आरोपी ताब्यात

**मुंबई : प्रतिनिधी**



बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी छत्तीसगडच्या दुर्ग रेल्वेस्थानकातून एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले. आकाश कन्नोजिया असे या संशयिताचे नाव असून त्याची चौकशी सुरू आहे.

सैफ अली खानवर त्याच्या मुंबईतील घरात मध्यरात्री हल्ला झाला होता. यात तो गंभीर जखमी झाला आहे. मुंबई पोलिसांनी याआधी शुक्रवारी एका संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली होती, मात्र या संशयिताचा या घटनेशी काहीही संबंध नसल्याचे चौकशीतून समोर आले. पोलिसांनी हल्लेखोरांच्या शोधासाठी मोहीम तीव्र केली असून ३५हून अधिक पथके तैनात करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

## निवडक

### महिला डॉक्टरवर बलात्कार, हत्येप्रकरणी संजय रॉय दोषी

**कोलकाता** : येथील आरजी कर



मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणात आरोपी संजय रॉय दोषी आढळला आहे. सियालदाह न्यायालयाच्या विशेष न्यायालयाने शनिवारी (दि. १८) हा निकाल दिला. आता आरोपी संजय रॉयला काय शिक्षा मिळणार याची घोषणा २० जानेवारी रोजी केली जाणार आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे स्नेहसंमेलन रंगले

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय मराठी माध्यमाचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि. १७) रंगले. या वेळी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अनंताशेठ ठाकूर, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, श्रीकांत घरत, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, सुधीर ठाकूर, अमर म्हात्रे, निलेश खारकर, कविता खारकर, राजेश खारकर, शैलेश भगत, दिलीप कोळी, रामनाथ कोळी, अंकिता खारकर, कांबळे गुरुजी, धीरज ओवळेकर, प्रतिभा भोईर, धनराज मुंगाजी, मुख्याध्यापिका व 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्स्ना ठाकूर आदी उपस्थित होते.



## जादूटोण्याच्या संशयावरून आदिवासी महिलेची नग्न धिंड

**चिखलदरा : प्रतिनिधी**

अमरावतीमधील मेळघाटात चिखलदरा तालुक्यातील रेहट्याखेडे गावात एका ७७ वर्षीय वृद्ध आदिवासी महिलेची जादूटोण्याच्या संशयावरून गावात नग्न धिंड काढण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

काढणी नंदराम शेलूकर अशी या पीडित वृद्ध महिलेचे नाव असून तिने मुलांसह चिखलदरा पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची तक्रार दाखल केली, मात्र आरोपींवर अंधश्रद्धा आणि जादूटोणाविरोधी कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल केला नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली जाईल आणि त्यानंतर जादूटोणासंदर्भात गुन्हे लावले जातील, असे पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सांगितले.



# रायगडात पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र विस्तारणार

## जिल्हाधिकाऱ्यांची बियाणे उत्पादन प्रकल्पाला भेट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा नियोजन समितीने २०२४–२०२५ या वर्षासाठी मंजूर केलेल्या विशेष प्रकल्पांतर्गत बिजोत्पादन प्रक्षेत्रास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भेट दिली आणि माहिती घेतली. पांढऱ्या कांद्याच्या लागवड क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी शेतकऱ्यांना सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही या वेळी सांगितले.



अलिबाग तालुक्यातील प्रकल्पातील लाभार्थी शेतकरी श्री सतीश शाम्रराव पाटील गांव सागाव यांच्या शेतावर राबविण्यात येत असलेल्या, अलिबागचा पांढरा कांदा आपल्या विशिष्ट चवीसाठी, उत्कृष्ट गुणवत्तेसाठी आणि आरोग्यविषयक फायद्यांसाठी प्रसिद्ध आहे. या कांद्याला भौगोलिक निर्देशांक (GI) टॅग मिळाल्यामुळे त्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रचंड मागणी आहे. मात्र, दर्जेदार बियाण्यांची मर्यादित उपलब्धता ही लागवड क्षेत्राच्या विस्तारासाठी मोठी अडचण ठरत होती. ही समस्या सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाने बियाणे उत्पादनासाठी नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरू केला आहे.

हा प्रकल्प वैज्ञानिक पद्धतीने राबविला जात असून कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे नियमित मार्गदर्शन दिले जात आहे. प्रकल्पाचे क्षेत्र तीन हेक्टर जमिनीवर पसरलेले असून अलिबाग तालुक्यातील अनेक गावांचा समावेश आहे. अलिबाग पांढऱ्या कांदा उत्पादक गटाच्या मदतीने २५९ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. सध्या पिक ५० टक्के फुलोऱ्याच्या टप्प्यात असून चांगल्या स्थितीत आहे. यामुळे यंदाच्या बियाणे उत्पादन हंगामात चांगले उत्पादन होण्याची अपेक्षा आहे.

ही भेट शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी आणि अलिबाग पांढऱ्या कांद्याच्या लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरली. या वेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी शेतकऱ्यांच्या प्रयत्नांचे आणि कृषी विभागाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले. त्यांनी शाश्वत शेतीचे महत्त्व स्पष्ट केले आणि शेतकऱ्यांना जीवामृत, बीजामृत यांसारख्या सेंद्रिय निविष्टा व जैविक उत्पादनांचा उपयोग करण्यास प्रोत्साहन दिले. मातीचा पोत सुधारण्यासाठी, पिकांचे संरक्षण करण्यासाठी आणि सुरक्षित, उच्च दर्जाच्या भाजीपाला उत्पादनासाठी हे घटक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, शेतकऱ्यांना अलिबाग पांढऱ्या कांद्याचे लागवड क्षेत्र दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यास प्रवृत्त केले आणि त्यांना शासकीय पातळीवरून पूर्ण मदत मिळेल, असे आश्वासन दिले.

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि शेतकरी व कृषी विभागाच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले. शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती पद्धती अवलंबून उत्पादनाची गुणवत्ता सुधारावी आणि टिकाऊ शेती साधावी, असा सल्लाही त्यांनी दिला. बियाणे उत्पादन तंत्र सुधारण्यासाठी त्यांनी तांत्रिक मार्गदर्शनही केले आणि शेतकऱ्यांनी प्रकल्पाचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रायगड वंदना शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी अलिबाग कैलास वानखेडे, उपसंचालक कृषी प्रवीण ठिगळे, तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, मंडळ कृषी अधिकारी नागाव मोहन सूर्यवंशी, कृषी सहाय्यक प्रल्हाद बनबरे आणि नितल ढोक उपस्थित होते. प्रगतशील शेतकऱ्यांनीही चर्चेत सहभाग घेतला आणि प्रकल्पाच्या यशस्वितेबाबत विचार मांडले. या वेळी सतीश कृष्णा म्हात्रे, संदीप वामन वाडेकर, स्वप्नील पांडुरंग पाटील शेतकरी उपस्थित होते.

या भेटीमुळे शेतकऱ्यांमध्ये नवीन प्रेरणा निर्माण झाली आहे. जिल्हाधिकारी जावळे यांच्या मार्गदर्शनाने आणि पाठिंब्याने शेतकरी प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अधिक आत्मविश्वासाने काम करत आहेत. या प्रकल्पातून तयार होणाऱ्या बियाण्यांच्या मदतीने कृषी विभाग अलिबाग पांढऱ्या कांद्याच्या लागवड क्षेत्राचा विस्तार करणार आहे, ज्यामुळे शेतीतील उत्पन्न वाढणार आहे. तसेच, सेंद्रिय निविष्टांचा वापर केल्यामुळे उत्पादनाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होईल.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या या भेटीने कृषी नवोपक्रम व शाश्वत शेतीला चालना देण्याचा प्रशासनाचा दृष्टीकोन अधोरेखित केला. त्यांच्या प्रोत्साहनाने आणि पाठिंब्याने शेतकरी प्रकल्पाच्या उद्दिष्टांसाठी अधिक जोमाने काम करतील. शेतकरी आणि कृषी विभागाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे शेती विकासात चांगली प्रगती होऊ शकते, हे या प्रकल्पाने दाखवून दिले आहे. GI टॅग असलेला अलिबाग पांढरा कांदा मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकण्यास सज्ज आहे. योग्य मार्गदर्शन आणि पाठिंब्याने हा उपक्रम अलिबाग तालुक्यातील शेती क्षेत्रासाठी सकारात्मक बदल घडवून आणणार आहे.



# शिरवणेत विविध उपक्रमांनी 'दिबां'ची जयंती साजरी

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी खासदार/आमदार/विरोधी पक्षनेता विधानपरिषद व श्रद्धेय लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त शिरवणे विद्यालय आणि जुनियर कॉलेज येथे डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी समाज बांधवांच्या वतीने दि.बा. पाटील यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी भूमिपुत्र, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल समाज बांधवांचा तसेच आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेतांचा सन्मान करण्यात आला. लोकनेते दि.बा.पाटील एक योद्धा विचार मंच यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या वेळी डॉ. राजेश पाटील यांनी लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या जीवनावर मार्मिक भाष्य केले. ते म्हणाले, दिबांचे विचार आणि त्यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी केलेला संघर्ष सगळ्यांपर्यंत पोहचला पाहिजे. ज्या व्यक्तीमुळे आज प्रत्येक प्रकल्पग्रस्त मानाने उभा आहे. त्यांच्या जयंतीसाठी मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहिले, त्यांना दिबाभक्त म्हणायला हरकत नाही. त्यांच्यामुळेच हा कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला. भविष्यातही असे कार्यक्रम करूच. शिवाय नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचं नाव तत्वतः मान्य केलेलं असलं तरी कागदोपत्री काम बाकी आहे. त्यामुळे जोपर्यंत विमानतळाला दि.बा. पाटील यांचं नाव दिलं जात नाही तोपर्यंत आमची आंदोलनात्मक भूमिका कायम राहील, हीच खरी आदरांजली असेल. तसेच राजाराम पाटील व दीपक पाटील यांनीदेखील मार्गदर्शन केले.


लोकनेते दि.बा. पाटील यांनी संघर्ष करून साडेबारा टक्क्यांची नवीन कायदा बनवला, तो भूसंपादनात संपूर्ण महाराष्ट्राला मार्गदर्शक आहे. म्हणून सर्वांनी दिबांचा अभ्यास केला पाहिजे. आजच्या कार्यक्रमात देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत सुंदर भाषणे दिली. दिबांचे विचार पोहचवण्यासाठी हे. आदर्श उदाहरण आहे. तसंच जमिनीच्या आंदोलनामध्ये भावंडांनी एकत्र राहणं ही काळाची गरज आहे, असा संदेश राजाराम पाटील यांनी दिला.

या वेळी काशिनाथ ज. पाटील, सुधाकर पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार, अविनाश सुतार, प्रकाश पाटील, सुरेश पाटील, रामनाथ ठाकूर, मेघनाथ पाटील, प्रल्हाद ठाकूर, सम्राट पाटील, साईनाथबुवा पाटील, प्रताप पाटील, प्रकाश पाटील, संयोजक ऋषिकेश पाटील, दिपेश द. पाटील आदी उपस्थित होते.

# सौरऊर्जेद्वारे वीज निर्मितीला प्रतिसाद

**कल्याण : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला महावितरणच्या कल्याण आणि भांडुप परिमंडलात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या लाभासाठी आतापर्यंत १३ हजार ८३१ जणांनी अर्ज केले आहेत.



यातील दोन हजार ४४८ ग्राहकांच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवून मोफत वीज मिळविण्यास सुरुवात झाली आहे. उर्वरित अर्जदारांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याची प्रक्रिया सुरू आहे अधिकाधिक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत पर्यावरणपूरक वीज निर्मितीसोबतच आपल्या मासिक वीजबिलात बचत करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणतर्फे रुफटॉप सोलर बसविणाऱ्या ग्राहकांना सोलर नेट मीटर मोफत देण्यात येत आहे. ग्राहक आणि सोलर रूफटॉप बसवणाऱ्या एजन्सींसाठी महावितरणने मीटर चाचणीची प्रक्रिया अतिशय सुलभ आणि जलद केलेली आहे. त्याचप्रमाणे १० किलोवॅटपर्यंत क्षमतेसाठी त्वरित स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे. या योजनेसाठी सवलतीच्या दरात बँकेकडून कर्ज उपलब्ध होते. पीएम–सूर्यघर योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर प्रकल्प बसवण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो.

प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. वीज ग्राहकांनी https://www.pmsuryaghar.gov.in/ या संकेतस्थळावर अर्ज करावयाचा असून सर्व सुविधा ऑनलाईन व पेपरलेस उपलब्ध आहेत.

# प्रांतीय निबंध लेखन स्पर्धेत मॉडर्न स्कूल अव्वल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे विजेतेपद मॉडर्न स्कूल व ज्यु. कॉलेज, वाशी यांच्या इंग्रजी विभागाने पटकावले आहे.

प्रथितयश भारतीय सामाजिक सांस्कृतिक स्वयंसेवी संस्था भारत विकास परिषदेच्या प्रांतीय निबंध लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ वाशी येथील आर्य समाज मंदिर सभागृहात पार पडला. २० डिसेंबर २०२४पर्यंत दिलेल्या विषयांवर, भारतीय स्वातंत्र्य सेनानी, वैज्ञानिक व थोर विभूती, विविध शाळांतील एकूण ४५० निबंध संस्थेस प्राप्त झाले. त्यांतील सर्वात जास्त निबंध रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूलमधील इंग्रजी माध्यमाचे चे निवडले गेल्याने विद्यालयाला जेतेपदाची ढाल देण्यात आली.



स्वामी विवकानंद जयंती दिनी संध्याकाळी आयोजित केलेल्या या समारंभाला भारत विकास परिषदेचे प्रांतीय अधिकारी रूपाणी, अध्यक्ष चोपडे, निबंध स्पर्धेचे प्रमुख मोदी, तसेच प्रमुख वक्ते म्हणून उर्मिला व अरविंद प्रजापती यांच्यासह विविध शाळांचे प्रतिनिधी शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या वेळी साईनाथ इंग्रजी हाय स्कूलच्या प्राचार्या पिल्लई या प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या.

# विद्यार्थ्यांसाठी 'इलेक्ट्रीक बॉय' माहितीपटाचे प्रदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र व गणित विभागाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१८) विद्यार्थ्यांसाठी इलेक्ट्रिक बॉय या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

या माहितीपट प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा वाढावी हा होता. महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी या इलेक्ट्रिक बॉय माहितीपटाचा आनंद घेतला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या माहितीपटाचे प्रदर्शन केल्याबद्दल भौतिकशास्त्र व गणित विभागाचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रदर्शनाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश उदेकर व गणित व भौतिकशास्त्र विभागातील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# बँक ऑफ इंडियातर्फे हिंदी दिवस



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया, रायगड आंचलिक कार्यालयात, अलिबाग येथे विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला.

या दरम्यान कार्यालयात स्टाफ सदस्यांनी दैनिक कामकाजामध्ये हिंदी भाषेचा वापर केला विभागीय प्रबंधक मुकेश कुमार व समस्त कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यालयीन कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची आग्रह केला.

विभागीय प्रबंधक मुकेश कुमार यांनी त्यांचे भाषणामध्ये हिंदी भाषाचे वैश्विक महत्व यावर प्रकाश टाकला. विभागीय अध्यक्ष मुकेश कुमार यांनी हिंदी स्पर्धेचे सर्व विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. विश्व हिंदी दिवसामध्ये ऑनलाईन बँकिंग व राजभाषा ज्ञान स्पर्धा घेण्यात आल्या.

विभागीय अध्यक्ष मुकेश कुमार आणि उप विभागीय प्रबंधक बिरेन चटर्जी यांनी हिंदी स्पर्धेच्या विजेत्यांना पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. मुकेश कमार यांनी स्पर्धेच्या विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार रमेश साखरे गच्छी, मुख्य प्रबंधक (राजभाषा) यांनी केले.

## दुखवटा

### यमुना देशमुख

**नवी मुंबई :** पत्रकार दीपक देशमुख यांच्या मातोश्री यमुना गोपाळ देशमुख (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती गोपाळ देशमुख, पुत्र सुरेश आणि दीपक, मुलगी शारदा, सुना, जावई राजेंद्र साठे आणि नातवंडे असा परिवार आहे. कै. यमुना देशमुख यांचा अंत्यविधी त्यांच्या मूळगावी कोळोशी, ता.मुरबाड,जी.ठाणे येथील स्मशानभूमीत शनिवारी झाला. या वेळी पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### हभप रामचंद्र कदम

**चौक :** ज्येष्ठ कीर्तनकार, जेष्ठ प्रवचनकार, सामाजिक कार्यकर्ते हभप. रामचंद्रमहाराज कदम (वय ८८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुलगे, तीन मुली, नातू, पुतणे असा मोठा परिवार आहे. कै. रामचंद्रमहाराज कदम यांचे अंतिम धार्मिक विधी रविवार, २६ जानेवारी २०२५ रोजी वावंढळ येथे होणार आहेत.



### केरू दया गावडे

**चौक :** जांभीवली गावचे रहिवासी असलेले केरु दया गावडे यांचे वयाच्या ७२व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुलगे असून वडिलांच्या व्यावसायात सक्रिय आहेत. घरची परिस्थिती बेताचीच असल्याने केरू दया गावडे यांनी भाजीपाला पिकवण्यास सुरुवात केली. कालांतराने त्यांनी वीट भट्टी उत्पादक म्हणून काम सुरू केले. चौक परिसरातील प्रमुख वीट उत्पादक आणि आदर्श शेतकरी म्हणुन त्यांनी नाव लौकीक केला.



पान १ वरुन

# स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ

पंतप्रधान स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते; रायगड जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील, चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.

# कर्जतमध्ये विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते भाजपत

भाजप तालुका सरचिटणीस संदीप म्हसकर, किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष अतुल बडगुजर, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर, जिल्हा उपाध्यक्ष स्नेहा गोगटे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रज्ञेश खेडकर, माथेरानचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी, कर्जत मतदारसंघात आजच्या तारखेला १२ हजार इतकी सदस्य नोंदणी झाली आहे. आपल्या मतदारसंघात असलेली मतदान केंद्र लक्षात घेऊन आपल्याला ७२ हजार सदस्य नोंदणी करायची आहे. पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या पक्ष सदस्य नोंदणीमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

या वेळी भाजपमध्ये तालुका अध्यक्ष राजेश भगत व जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली नेरळ व्यापारी फेडरेशनचे माजी अध्यक्ष आणि काँग्रेस तालुका उपाध्यक्ष अरविंद कटारिया, राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा परिषद अध्यक्ष मयूर हजारे तसेच निवृत्त मोटरमन सुनील मिसाळ, उमरोली ग्रामपंचायत सदस्य प्रचिती गायकर, मनसे कार्यकर्ते सचिन गायकर, माजी सदस्य दीपक पाटील, विभाग प्रमुख मनोज ठाणगे, उपविभाग प्रमुख कृष्णा श्रीखंडे, मनेश राजगुरू यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेशकर्त्यांचे भाजपची शाल देऊन स्वागत करण्यात आले.

# जुन्या चाळी, सोसायट्यांतील रहिवाशांसाठी कार्यशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई एच.डी. गावकर सेवा संस्था या मुंबईसह कोकण विभागात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या मान्यवर संस्थेतर्फे येत्या २५ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ४.३० वाजला, डॉ. शिरोडकर हायस्कूल सभागृह, मुंबई येथे मध्य मुंबईतील जुन्या चाळी आणि गृहनिर्माण सोसायट्यांतील रहिवाशांसाठी पूनर्विकास आणि पुनर्विकासाची संपूर्ण प्रक्रिया आदीबाबत कायदेशीर मार्गदर्शन करणारी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

संबंधितानी या कार्यशाळेत सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करावा असे आवाहन एच. डी. गावकर सेवा संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम आणि सचीव सौरभ उल्हास गावकर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

या कार्यशाळेत सुप्रसिध्द कायदेतज्ज्ञ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस् महासंघ मर्यादित या संघटनेचे तज्ज्ञ संचालक ॲड. श्रीपसाद परब (बी.ई. सिव्हिल, एल.एल.एम.) यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होईल, अशी माहिती या प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली आहे. अनेक चाळी आणि इमारती या चाळीस–पन्नास वर्षातून अधिक काळ जुन्या आहेत. त्यातील बऱ्याच जुन्या चाळी व सोसायट्या पुनर्विकासासाठी जाण्याच्या तयारीत आहेत. त्यातील सदस्यांना पूनर्विकास आणि पुनर्विकासाची संपूर्ण प्रक्रिया आदीबाबत कायदेशीर मार्गदर्शनाची आवश्यकता भासते.

## निवडक

### तीन वर्षांच्या मुलासह आई बेपत्ता



**पनवेल :** तीन वर्षांच्या मुलासह आई बेपत्ता झाल्याची घटना खैरणे गावात घडली असून याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जयंती सोमनाथ हलदार (२५ रा.खैरणे) व तिचा तीन वर्षीय मुलगा वरुण हे कुठेतरी निघून गेले आहेत. जयंती हलदार हिची उंची पाच फुट, बांधा सडपातळ, डोळे काळे असून अंगात गुलाबी साडी, पायात चप्पल व तिला बंगाली भाषा अवगत आहे. तसेच मुलगा वरुण हा रंगाने सावळा आहे. या दोघांबाबत माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा हवालदार आण्णासाहेब हसबे (९८६७१३६८७६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कुशल चौधरीचे सुयश

**पनवेल :** चेन्नई येथे झालेल्या इंडियन नॅशनल ऑटोक्रॉस चॅम्पियनशिप २०२४ या कार रेसिंग स्पर्धेत नवीन



पनवेलमधील कुशल सुरेश चौधरी हे IN-C 3, CLASS - B (1101 - 1400 CC) आणि IN-C 3, CLASS - E (२WD ओपन) या दोन्ही राऊंडमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान त्यांनी पटकावला असून भारतातून पहिला येण्याचा मान त्यांना मिळाला आहे. या यशाबद्दल कुशल चौधरी यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

### 'लायन्स'तर्फे पत्रकारांचा सन्मान



**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे पनवेलमधील पत्रकार बंधूंचा सन्मान करण्यात आला. सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी पत्रकारांचे आभार मानले आणि भविष्यातदेखील असेच सहकार्य मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, प्रमोद वालेकर आणि कुणाल लोंढे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले. सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले. या वेळी सरगम क्लबचे सचिव प्रेमेंद्र बहिरा, स्वाती गोडसे, आदित्य दोशी, ओमकार खेडकर, सुषमा पन्हाळे आदी उपस्थित होते.

### रंगनाथ नेरुरकर यांना पुरस्कार

**पनवेल :** मूळ सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सुपुत्र आणि सध्या पनवेल येथील वि. के. हायस्कूलमधे कलाशिक्षक असलेल्या नेरुरकर यांना कला व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल आदर्श कलाध्यापक या पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांना प्राप्त पुरस्काराबद्दल रायगड कलाध्यापक संघ, वि.के. हायस्कूलच्या मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद तसेच सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ या संस्था तसेच मित्रपरिवाराकडून रंगनाथ नेरुरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



# 'जेबीएसपी'च्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मशीन लर्निंगवर कार्यशाळा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१७) संगणक व माहिती व तंत्रज्ञान व वर्कशॉप व कॉन्फरन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मशीन लर्निंगवर कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी नम्रता मोदी एआयआय आयटीएस यांनी महाविद्यालयात संगणक व माहिती व तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर तसेच मशीन लर्निंग याविषयी हँडसम ट्रेनिंग व मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात ही कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे तसेच प्रा. प्रथमेश उदेकर तसेच संगणक व माहिती व तंत्रज्ञान विभागातील इतर सर्व प्राध्यापक त्याचबरोबर वर्कशॉप व कॉन्फरन्स समितीतील इतर सर्व सदस्य उपस्थित होते.

## 'सीकेटी'त करिअरविषयक सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये येथे प्लेसमेंट सेलद्वारे शनिवारी (दि.१८) Future ready: Understanding the job market and Career planning या सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात रिलायंस फाउंडेशनच्या प्रशिक्षक आणि सल्लागार पल्लवी वाबळे व कार्यक्रम व्यवस्थापक अक्षय माने यांनी रिलायंस फाउंडेशन हे विद्यार्थ्यांना नोकरीसाठी कसे तयार करतील यावर चर्चा केली तसेच पदवीधर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबद्दलही सांगितले. सर्व विभागातील अंतिम वर्षाच्या एकूण ९८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

वाणिज्य शाखा प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, प्रो.डॉ. ए. के. दीक्षित, प्लेसमेंन्ट सेलचे चेअरमन प्रा. सत्यजित कांबळे, ट्रेनिंग आणि प्लेसमेन्ट ऑफिसर आरती कागवाडे व प्लेसमेंट सेल सदस्यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा. मिशेल जेन्सी आणि आभार प्लेसमेन्ट सेलचे चेअरमन कांबळे यांनी मानले.



## ग्रंथालयातर्फे पुस्तक प्रदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मुंबई विद्यापीठांतर्गत ग्रंथालयातर्फे पुस्तक प्रदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी हा होता.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रंथालयामध्ये वेगवेगळे विषयाचे मासिके, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके, संदर्भ ग्रंथ यांचे प्रदर्शन केले होते. या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पुस्तके वाचण्याचा आनंद घेतला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल ग्रंथालय समितीचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले तसेच वैभव झगडे, ग्रंथालय समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## चांगू काना ठाकूर महाविद्यालयामध्ये टेक फेस्ट उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे E Fest Technophoenix या टेक फेस्टचे १७ आणि १८ जानेवारी २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून TCS, Thane चे Solution Architect विनायक शेंद्रे यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे, विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या समन्वयिका डॉ. एम. ए. म्हात्रे यांची उपस्थिती लाभली.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. आय. एस. ठाकरे यांनी E Fest मधील उपक्रमांबद्दल आढावा दिला व प्रमुख पाहुणे विनायक शेंद्रे यांचा परिचय उपस्थितांना करून दिला. विनायक शेंद्रे यांनी विद्यार्थ्यांना वेळ आणि पैसा यांचा समतोल राखुन ध्येयप्राप्ती कडे वाटचाल कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले आणि आयटी क्षेत्रातील विविध संधींची माहिती दिली. त्याचबरोबर Artificial Intelligence and its Applications या विषयाचे वेगवेगळे उदाहरणे देऊन महत्त्व विषद केले.

या कार्यक्रमात क्विझ स्पर्धा, लोगो डिझायनिंग, वेब डिझायनिंग, कॅप्शन द पिक, डिबेट कॉम्पिटिशन, रॅपिड ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट, किल द बग्स आणि लॅन गेमिंग अशा तब्बल आठ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. या दोन दिवसीय कार्यक्रमात संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या तब्बल ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विभागाची विद्यार्थिनी दीप्ती पाटील व तन्वी पवार यांनी केले. तसेच संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. पी. एम. जाधव यांनी आभार मानले. तसेच आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हे आपले माजी विद्यार्थी आहेत याबद्दल आम्हाला अभिमान आहे, असे गौरवोउद्गार काढले. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विभागाच्या प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.



**उलवे नोड : चाणक्या नारायणी शक्तीतर्फे हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सेक्टर १६मधील महिलांसह वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, चाणक्या नारायणी शक्तीचे संस्थापक अ‍ॅड. सुनील मौर्य, अवधेश महतो, संतोष तुडमे, गोविंद भट्ट, तात्यासाहेब बिरादर, अशोक पाठक, सभाजीत पटेल, अजय मोहन, रजनीश पटेल, हरीश मिश्रा आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : येथील सेक्टर ८ ई येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते स्ट्रीट लाईटचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी रहिवाशांसह भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, मयुरेश म्हात्रे, अवधेश महतो, महिंद्र घरत, वैभव घरत, साईचरण म्हात्रे, मदन पाटील, उदय पांडे, देवालय मित्रा, विश्वनाथ कोळी आदी उपस्थित होते.**

## गार्डनमधील समस्या सोडविणार –विकास घरत



**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीमधील गार्डनमध्ये बसविण्यात आलेल्या गार्डनमधील ग्रास आणि वॉकींग ट्रॅक या समस्येचे लवकरात लवकर निराकरण करणार, अशी ग्वाही माजी नगरसेवक विकास घरत यांनी या भागातील नागरिकांशी चर्चा करताना केली.

कामोठे सेक्टर ३६ मधील नागरिकांनी प्लॉट १७– गार्डन मध्ये बसविलेल्या जिमच्या मेंटेनन्स बद्दल चर्चा करण्यात आली. तसेच आता लहान मुलांसाठी खेळणी बसविली आहे. याबाबत नागरिकांनी माजी नगरसेवक विकास घरत यांचे आभार मानले. आणि गार्डनमधील ग्रास आणि वॉकिंग ट्रॅक या समस्येबद्दल चर्चा करून लवकरात लवकर प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले आहे.

## कामोठे येथे नेत्र तपासणीसह मतदान ओळखपत्र वाटप





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

एक्सलेंट आर के अर क्लिनिकचे अध्यक्ष मयूर मोहिते यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्ष अनुसूचित जाती मोर्च्याच्या वतीने मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप आणि मोफत मतदान ओळखपत्र वाटप या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते.

कामोठ्यातील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयात या शिबिराचा आयोजन करण्यात आले होते. शिबिराला नागरिकांनी प्रतिसाद दिला. या वेळी भाजपचे हर्षवर्धन पाटील, भाऊ भगत, रवी गोवारी, तेजस जाधव, विद्याताई तामखेडे, अमित रोकडे आदी उपस्थित होते.

## शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रकल्पात शितलकुमार म्हात्रे जिल्ह्यात प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे झालेल्या ५२व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे उपक्रमशील विज्ञान शिक्षक शितलकुमार म्हात्रे यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती सादरीकरण प्रकल्पात जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आणि अमरावती येथे महिनाअखेरीस होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड निश्चित केली.



शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हे घोषवाक्य निर्धारित करून रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग, अलिबाग यांच्या वतीने पनवेल येथे के.आ.भाटिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व रायगड जिल्हा गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या ५२ व्या रायगड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शितलकुमार म्हात्रे यांचा 'अ...अ...अणूचा!' या शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रकल्पाला रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला.

नवीन पनवेल येथे १७ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या रायगड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या सांगता समारंभात शितलकुमार म्हात्रे यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी श्रीमती चांदोरकर मॅडम, पनवेल महानगरपालिका शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा शा.पो. आ. अधिक्षक नवनाथ साबळे, प्राचार्य बी.एस.माळी, प्राचार्य पालवे, प्राचार्य भगत, राज्य बाल वैज्ञानिक परिषद समन्वयक विश्वास कोरडे, अनिल पाटील, यासीन पोशिलकर, फंगल सर, विनोद डाकी, मानकर आदी उपस्थित होते.

## खरी कमाई उपक्रमामध्ये सीकेटी विद्यालयाचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयातील कब – बुलबुल युनिटमधील विद्यार्थ्यांनी सन २०२३/२०२४ या शैक्षणिक वर्षात खरी कमाई या उपक्रमामध्ये रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

रायगड भारत स्काऊट आणि गाईड्स, ४१वा जिल्हा मेळाव्याच्या उद्घाटन समारंभामध्ये रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग पुनिता गुरव मॅडम आणि उपशिक्षणाधिकारी शेडगे साहेब यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

पारितोषिक स्वीकारताना मुख्याध्यापक सुभाष मानकर सर, प्रवीण पाटील व लता मोटे (मार्गदर्शक शिक्षक) उपस्थित होते.



## रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत गोदरेज सिटीतर्फे उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रस्ता सुरक्षा सप्ताह ११ ते १७ जानेवारी २०२५पर्यंत साजरा करण्यात येत आहे. गोदरेज सिटी पनवेलतर्फे प्रोजेक्ट डायरेक्टर शर्मा, जनरल मॅनेजर प्रोजेक्ट अजय संघानसिंग, प्रोजेक्ट मॅनेजर मायकल ऑगस्टीन, जनरल मॅनेजर सेफ्टी जोगेद प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली अभिनव उपक्रम हाती घेतला.

दारू पिऊन गाडी चालवल्याने होणारे अपघात या विषयावर जागरूकतेसाठी देखावा सादर करण्यात आला. पी आई यांच्या अनुमतीने पळस्पे चौकात रस्ता सुरक्षा अभियान झाले.


# 'दीवार' ५० वर्ष


## तोच अनुभव, तोच थरार आजही कायम!

झूम प्रहर




दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक





'दीवार' म्हणताच अनेक गोष्टी माझ्या डोळ्यासमोर येतात... ते माझे शालेय वय. सत्तरच्या दशकात सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहावरील नवीन चित्रपटाचे डेकोरेशन पाह्यच्या अलिखित संस्कृतीनुसार मिनर्व्हा थिएटरवरचे दीवारच्या पोस्टर डिझाईनवरील शर्टाला गाठ घालून नजरेत खुन्नस भरलेला अमिताभचा भला मोठा कटआऊट, शशी कपूरचे पोलीस इन्स्पेक्टरचे रुपडे, निरुपा रॉयला मिळालेले मोठे स्थान हे सगळेच दिसत होते. मिनर्व्हावर पोस्टर डिझाईनला स्कोप भरपूर. पिक्चरचा जणू एक प्रकारचा ट्रेलर. हा दिवस होता, २४ जानेवारी १९७५. चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखील.

आदल्याच दिवशी मुंबईच्या अगदी नवीनच अशा वानखेडे स्टेडियमवर भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील त्या मालिकेतील पाचवा कसोटी सामना सुरू झालेला. या स्टेडियममधील हा पहिलाच कसोटी क्रिकेट सामना. त्यालाही पन्नास वर्ष पूर्ण.

चित्रपटाच्या पोस्टरवर आणि थिएटर डेकोरेशनवर चित्रपटातील आईला महत्त्वाचे स्थान दिलेले आणि पटकन आठवणारे दोन हिंदी चित्रपट, मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया (१९५७)मधील अतिशय करारी मां राधा (नर्गिस) आणि यश चोप्रा दिग्दर्शित दीवार (१९७५)मधील अशीच आदर्शवादाचा रस्ता चुकलेल्या मुलाविरुध्द ठामपणे उभी राहिलेली मां (निरुपा रॉय)

दीवारच्या पटकथेत याच 'मदर इंडिया'ची आई आणि नितीन बोस दिग्दर्शित गंगा जमुना (१९६१)मधील भिन्न स्वभावाचे, प्रवृत्तीचे भाऊ या तीन व्यक्तिरेखांमधील भावनिक नाट्य पाह्यला मिळते... खुद्द पटकथा व संवाद लेखक सलिम जावेद यांनीच ही गोष्ट अनेकदा सांगितलीय. ते करताना त्यांनी अनेक गोष्टींसह त्यात आपले लेखनाचे कसब, कौशल्य दाखवले. मूळ ग्रामीण भागातील या गोष्टी सत्तरच्या दशकातील शहरी भागात घडवल्या हा वरकरणी बदल झाला. त्यांनी आपणच लिहिलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर (१९७३)मधील अमिताभ बच्चनच्या सूडनायक (अॅन्ग्री यंग मॅन)ची अभिनय क्षमता आणि सत्तरच्या दशकातील बदलता चित्रपट आणि त्याचे रसिक प्रेक्षक यांचे भान ठेवले. या सगळ्यातून त्यांनी दीवार लिहिला...

गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित दीवार निर्मितीमागे अनेक रंजक घडामोडी आहेत. एक व्यावसायिक चित्रपट निर्माण होताना पडद्यामागे बरेच काही घडत बिघडत असते हे जाणून घेणे हादेखील चित्रपट अभ्यासाचाच भाग.

अमिताभ बच्चनलाच डोळ्यासमोर ठेवून सलिम जावेद यांनी दीवार लिहिला. त्याच सुमारास यश चोप्रा यांचे बंधु धरम चोप्रा यशराज फिल्मसाठी 'गर्दीश' नावाच्या चित्रपटाचे दिग्दर्शन करीत होते. त्यात अमिताभ, नीतू सिंग व परवीन बाबी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. त्याच चित्रपटाच्या सेटवर सलिम जावेद यांनी अमिताभला 'दीवार'चे कथासूत्र ऐकवले. ते त्याला आवडले, पण यश चोप्रा यांना सलिम जावेद यांनी याच पटकथेची सांगितलेली किंमत फारच वाटली. तरी त्यांनी निर्माते गुलशन रॉय यांच्या त्रिमूर्ती फिल्म या बॅनरखाली दीवार बनवायचा विचार केला आणि हे दोघे, यशजींचा सहाय्यक रमेश तलवार आणि सलिम जावेद अशी एक स्टोरी सिटींग ठरवली. (यशजींचा 'दाग' गुलशन रॉय यांच्या मॉडर्न मुव्हीज या वितरणने प्रदर्शित केला. याच गुलशन रॉय यांच्या निर्मिती संस्था त्रिमूर्ती फिल्मसाठी यशजींनी 'जोशीला' दिग्दर्शित केला. हे दोन्ही चित्रपट १९७३ साली प्रदर्शित झाले.) गुलशन रॉय यांनी स्टोरी ऐकली आणि विजयच्या भूमिकेसाठी राजेश खन्ना असेल असे म्हटले. त्याच्या सुपर स्टार यशाचा तो काळ होता आणि गुलशन रॉय यांनी त्याला करारबद्धही केला होता. सलिम जावेद मात्र अमिताभच्याच नावावर ठाम राहिले. राजेश खन्नासाठी वेगळी पटकथा देतो म्हणाले. विजयचा धाकटा भाऊ रविच्या भूमिकेसाठी नवीन निश्चलला विचारले. त्याने आपण ज्योती स्वरुप दिग्दर्शित 'परवाना' (१९७१)मध्ये नायक असताना अमिताभ व्हीलन होता. आता आपण दुय्यम भूमिका का साकारु असे म्हणतच नकार दिला. शत्रुघ्न सिन्हाने अगोदरच राजेश खन्नाचा छोटा भाऊ साकारण्यास नकार दिलेला. यश चोप्राना शशी कपूरने होकार देताना प्रश्न केला, मी अमिताभचा लहान भाऊ म्हणून कसा शोभणार? यशजींनी त्याला विश्वास दिला की ती जबाबदारी माझी... आईच्या भूमिकेसाठी वैजयंतीमालाला विचारण्यासाठी गुलशन रॉय व यश चोप्रा चेन्नईला (तेव्हाचे मद्रास) गेले. तिने आपल्या चित्रपट क्षेत्रातील निवृत्तीच्या निर्णयाशी ठाम राह्यचे ठरवले. निरुपा रॉयच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. एव्हाना 'गर्दीश' चित्रपट मध्येच बंद झाल्यावर नीतू सिंग व परवीन बाबी 'दीवार'साठी निश्चित झाल्या.

अन्य कलाकार निश्चित होत होत २१ मार्च १९७४ रोजी परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत दीवारचा मुहूर्त झाला (यशजींच्या यशराज फिल्मचे कार्यालय राजकमल स्टुडिओत होते) चित्रपती व्ही. शांताराम, विजय आनंद यांच्या खास उपस्थितीत दीवारचा मुहूर्त झाला, पण यावेळेस शशी कपूर नव्हता, पण का? त्याच दिवशी तो शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी गेला होता. आपले चित्रपट यशस्वी व्हावेत असा त्याला आशीर्वाद हवा होता. (१८ मार्च रोजी त्याची भूमिका असलेला अशोक रॉय दिग्दर्शित 'चोर मचाये शोर' प्रदर्शित होत होता. आणि त्याने शिर्डीला जावे असा सल्ला त्याला मनोजकुमारने 'रोटी कपडा और मकान'च्या सेटवर दिला होता. एका चित्रपटामागे किती व कशा रंजक गोष्टी घडताहेत याचे उत्तम उदाहरण)

अमिताभ एकाच वेळेस बंगलोरजवळील रामगढ येथील रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (अर्थात १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित)चे दिवसभर शूटिंग करून संध्याकाळच्या विमानाने मुंबईत येऊन 'दीवार'चे शूटिंग करून सकाळीच विमानाने बंगलोरला जाई. खुद्द अमिताभनेच कौन बनेगा करोडपतीमध्ये ही गोष्ट सांगितलीय. तो विमानात झोप पूर्ण करे.

मूळ पटकथेत गाण्यांना जागा नव्हती. गुलशन रॉय यांना हे मान्य नव्हते. मग पटकथेत गाण्याच्या जागा काढल्या तरी दोन गाणी चित्रीत होऊनही संकलनाच्या टेबलावर कापली. देवेन वर्मा याच्यावरचे इधर का माल उधर आणि मन्ना डेने गायलेले दीवारों का जंगल ही गाणी चित्रपटात नाहीत, पण ग्रामोफोन रेकार्डवर आहेत. अमिताभ व परवीन बाबी यांच्या हॉटेलमधील भेटीच्या वेळच्या बॅकग्राऊंडला असलेल्या आय म फॉलिंग इन लव्ह गाण्यात अमिताभ घड्याळात पाहतो तत्क्षणीचा म्युझिक पंच बेहतरीन.

फर्स्ट शोपासूनच 'दीवार' सुपरहिट. या चित्रपटातील काही प्रसंग हाजी मस्तानच्या आयुष्यावर आधारित आहेत असेही म्हटले जाते.

पटकथा लेखनाच्या अभ्यासक्रमात 'दीवार' सर्वोत्तम. चित्रपट अनपेक्षित वळणे घेत घेत रंगतो. यातील अनेक गोष्टी पन्नास वर्षांपूर्वीच्या चित्रपटात विशेष उल्लेखनीय होत्या. विजयच्या वडिलांवर (सत्येन कप्पू) चोरीचा आळ येतो आणि त्या रागातून सहकारी कामगार विजयच्या हातावर गोंदवतात, मेरा बाप चोर है... विजय मोठा झाल्यावर मृत पित्याला अग्नि देताना हातावरचे शर्ट थोडे वर सरकते आणि तेच गोंदवलेले शब्द दिसतात... लहानपणी विजय रस्त्यावर बुट पॉलीशचा व्यवसाय करीत असताना मुल्कराज दावर (इफ्तेखार) त्या कामाचे पैसे त्याच्या अंगावर फेकताच विजय उफाळून म्हणोत, मै फेके हुये पैसे नहीं उठाता... तो मोठा झाल्यावर दावरला याच क्षणाची आठवण देत म्हणतो, आज भी मै फेके हुये पैसे नही उठाता...

दीवारमध्ये मानसिक व्दंव्द बरेच आहे. अतिशय प्रभावी व बोलक्या संवादातून चित्रपट आपल्याला गुंतवून ठेवतो. गैरमार्ग हेच जगण्याचा सूत्र असे मानत असलेला आणि गुन्हेगारी विश्वात झपझप वरची पायरी चढत गेलेला विजय आणि त्याचा हाच रस्ता मान्य नसलेला त्याचा भाऊ रवि यांच्या संघर्षांत त्यांच्या आईला म्हणजे सुमित्रा देवी यांना आपल्या मोठ्या मुलाचे न आवडणारे वागणे असा हा संघर्ष. संवादातून चित्रपट जास्त प्रभावी ठरतो.

आज मेरे पास बंगला है, गाडी है, बॅन्क बॅलन्स है, क्या है तुम्हारे पास? मेरे पास मा है... प्रेक्षागृहात कमालीची शांतता, कारण असं काही ऐकायला मिळेल अशी अपेक्षाच नव्हती.

जाओ पहले उस आदमी का साईन लेकर आओ जिसने मेरे बाप को चोर कहा था...फिर तुम जहा कहोंगे मेरे भाई, वहा मै शादी करुंगा... अगदी छोट्या संवादातूनही फार प्रभात दाखवला.

खुश तो बहुत होगे तुम... क्लायमॅक्सला विजय देवाच्या मूर्तीशी बोलतो हा प्रसंग साकारण्यापूर्वी आपण बरीच तयारी केली. दिवसभर तो मेकअप रुममध्ये बसून या दृश्याची/संवादाची तयारी करत होता. मुळात तो आस्तिक आणि त्याला नास्तिक साकारायचा होता. आपल्या आईच्या कुशीत त्याचा मृत्यू होणे हेदेखील दृश्य असेच कसोटीचे. आपण या दृश्याच्या शूटिंगच्या वेळेस बोललेले डायलॉग तसेच ठेवावेत तरच त्यात खऱ्या भावना उतरतील (डबिंग करु नये असे अमिताभचे म्हणणे होते). असे काही वर्षांपूर्वी अमिताभने सोशल मिडियातील आपल्या एका पोस्टमध्ये म्हटले.

दीवारच्या संवादाच्या ध्वनिमुद्रिका प्रकाशित होताच त्याची विक्रमी विक्री झाली. हे डायलॉग ऐकून टाळ्या नि शिट्ट्या वाजवण्यासाठीही अनेकांनी दीवारसाठी पुन्हा पुन्हा चित्रपटगृहाची वारी केली. ७८६ या बिल्ल्याची भूमिका महत्त्वाची. हा आकडा इस्लाममध्ये पवित्र मानला जातो. के.जी. कोरगावकर यांचे छायाचित्रण आणि टी. आर. मंगेशकर व प्राण मेहरा यांचे संकलन यांचा वाटा खूपच महत्वाचा.

मिनर्व्हात पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केल्यावर मोती चित्रपटगृहात दीवार प्रदर्शित केला आणि तेथे पन्नासाव्या आठवड्यापर्यंत वाटचाल केली. तेथून लिबर्टी चित्रपटगृहात मॅटीनी शोला चित्रपट शिफ्ट केला आणि शंभराव्या आठवड्यापर्यंत चित्रपटाने मुक्काम केला. सुपरहिट चित्रपट पुन्हा पुन्हा पाहण्याचे ते दिवस होते. चित्रपटही तसेच पुन्हा पुन्हा पहावेत असे असत.

दीवार चित्रपटगृहातून उतरला तरी त्याचा प्रभाव व अस्तित्व आजही कायम आहे. सलिम जावेद जोडी फुटल्यावर जावेद यांनी जीवन एक संघर्ष (दिग्दर्शक राहुल रवैल) आणि सलिम यांनी नाम (दिग्दर्शक महेश भट्ट), फलक (दिग्दर्शक शशिलाल नायर) हे चित्रपट दीवारचीच एक प्रकारची रिमेक होती, पण हे चित्रपट पूर्णपणे फसले.

दीवार एकदाच पडद्यावर येतो. असे चित्रपट पुन्हा पुन्हा बनत नाहीत आणि ते शक्यही नाही. पन्नास वर्षांनंतरही दीवार एक ताकदवान प्रभावी चित्रपट आहे. डिजिटल मिडियात कुठूनही कधीही कितीही पहावा तोच प्रभाव, तशीच रंजकता. तोच अनुभव तसाच थरार.

आजही माझ्या डोळ्यासमोर मिनर्व्हावरील 'दीवार 'चे डेकोरेशन कायम आहे... दीवारने मिनर्व्हात पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केल्यावर १५ ऑगस्ट १९७५ रोजी शोले प्रदर्शित झाला आणि हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासाचे नवीन पर्व सुरु झाले. त्यालाही आता पन्नास वर्ष पूर्ण होतील... आणि आता आठवण अमिताभने शर्टाला गाठ मारली त्याची! ते ठरवून केले की स्टाईल म्हणून केले? असे नव्हे तर टेलरने अमिताभचे शर्ट अवाजवी मोठे शिवले. आता करायचे काय? अमिताभ शर्टाला गाठ बांधून यशजींसमोर आला आणि यशजीही ते पाहून इम्प्रेस झाले. आणि ते तसेच ठेवायचे ठरले आणि मग त्या गाठेने अमिताभला आणखी एक वेगळे रूप दिले.

# दिग्दर्शक, अभिनेते, निर्माते उर्फ मास्टर विनायक



ख्यातनाम मराठी अभिनेता, दिग्दर्शक व आणि निर्माते अशी विनायक दामोदर कर्नाटकी उर्फ मास्टर विनायक यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा जन्म १९ जानेवारी १९१० रोजी कोल्हापूर येथे झाला व तिथेच शिक्षण. पिंडाचे कलावंत असूनही विनायकरावांना कोल्हापूरच्या विद्यापीठात परिस्थितीमुळे काही काळ शिक्षकाची नोकरी करावी लागली. ते चित्रपटसृष्टीकडे वळले ते प्रथम अयोध्येचा राजा (१९३२) या हिंदी-मराठी प्रभातच्या चित्रपटात नारदाच्या भूमिकेकडे.

विनायकरावांनी प्रभात फिल्म कंपनीच्या पाच चित्रपटांत भूमिका केल्या त्यानंतर प्रभात कंपनीचे पुण्यात स्थलांतर झाले. त्यामुळे विनायकरावांनी कोल्हापूर सिनेटोनमध्ये प्रवेश केला. विनायकरावांना दिग्दर्शनाची पहिली संधी येथेच मिळाली. विलासी ईश्वर (१९३५) ही मामा वरेरकरांची गोष्ट अनौरस संततीच्या एका ज्वलंत सामाजिक समस्येवर आधारलेली होती. त्याचे दिग्दर्शन म्हणजे विनायकरावांना एक आव्हानच होते. तथापि वाङ्मयाची व चित्रपटमाध्यमाची उत्तम जाण असलेल्या विनायकरावांना ते आव्हान समर्थपणे पार पाडले.

याच सुमारास बाबूराव पेंढारकरांनी विनायकराव आणि पांडुरंग नाईक यांच्या भागीदारीतील 'हंस पिक्चर्स'ची स्थापना केली. हंस पिक्चर्सची चार वर्षे म्हणजे अभिनेता आणि दिग्दर्शक या नात्याने विनायकरावांच्या आयुष्यातील सुवर्णकाळच म्हटला पाहिजे. विनायकरावांनी हंस पिक्चर्सकरिता दिग्दर्शित केलेले सर्व चित्रपट, ज्वाला (१९३८) सोडून, सामाजिक होते, परंतु विनायकरावांसारख्या प्रतिभाशाली कलावंताचा त्याला स्पर्श झाल्यामुळे ते अजरामर बनले. त्यांत छाया (१९३६)सारखे गंभीर व सामाजिक समस्यांना स्पर्श करणारे आणि कारुण्याने ओलावलेले चित्रपट जसे होते तसेच ब्रह्मचारी (१९३८), ब्रँडीची बाटली (१९३९) यांसारखे हास्यरसप्रधान चित्रपटही होते. वि.स. खांडेकरांच्या भाषेत सांगायचे तर ढेरपोटी माणसे किंवा तोतऱ्या व्यक्ती या किंवा अशा प्रकारच्या स्थूल विनोदापलिकडे ज्या चित्रपटांची झेप सहसा जाऊ शकत नव्हती. त्यांच्यावर उपहास, उपरोध, विडंबन, शुद्ध विनोद व चतुर कोटीक्रम या सर्वांचा विलास त्यांनी मूर्तिमंत उभा केला होता.

हंस पिक्चर्सच्या कारकीर्दीत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सल्ल्याने पडद्यावरील इंग्रजी श्रेयनामावलीचे संपूर्णतः मराठीकरण प्रथम विनायकरावांनीच केले. हंस पिक्चर्स बंद झाल्यावर १९४० साली विनायकराव नवयुग चित्रपट संस्थेत गेले. तेथेही त्यांनी लग्न पहावे करून (१९४०), अमृत (१९४१), सरकारी पाहुणे (१९४२) असे लक्षात राहणारे चित्रपट दिग्दर्शित केले. मास्टर दीनानाथांची चिमुरडी मुलगी लता मंगेशकर हिच्यातील अभिजात कलागुण प्रथम ओळखले ते विनायकरावांनीच व त्यांनीच तिला चित्रपटसृष्टीतही आणले (पहिली मंगळागौर, १९४२). दुर्दैवाने विनायकरावांना तो चित्रपट अर्धवट सोडून जावे लागले. तथापि १९४३ साली त्यांनी आपली स्वतःची प्रफुल्ल पिक्चर्स ही संस्था स्थापन केली आणि लतालाही त्यात सहभागी करून घेतले. माझं बाळ (१९४३) हा प्रफुल्लचा चित्रपट म्हणजे विनायकरावांमधील प्रतिभाशाली कलावंताचे दर्शन घडविणारा होता.

प्रफुल्ल पिक्चर्सचा संचार चालू असतानाच विनायकरावांनी शांताराम बापूंच्या व्ही. शांताराम डॉ. कोटनीस की अमर कहानी (१९४६) या चित्रपटात एक भूमिकाही केली होती. विनायकरावांनी पूर्णपणे दिग्दर्शित केलेला शेवटचा चित्रपट म्हणजे राजकमल कलामंदिरचा जीवनयात्रा (१९४६). त्यानंतर प्रफुल्ल पिक्चर्सचा मंदिर (१९४८) हा चित्रपट अर्धवट तयार झाला असतानाच १९ ऑगस्ट १९४७ विनायकरावांची जीवनयात्रा संपली.

तत्पूर्वी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र झाल्याचे पाहून देशप्रेमी विनायकराव विलक्षण भारावून गेले होते. त्यानंतर चारच दिवसांनी विनायकरावांचे मुंबई येथे देहावसान झाले. चित्रपटसृष्टीतील आपल्या १६ वर्षाच्या कारकीर्दीत विनायकरावांनी १८ चित्रपटांचे दिग्दर्शन केले आणि त्यांपैकी बऱ्याच चित्रपटांत भूमिकाही केल्या होत्या. भारतीय चित्रपटसृष्टीतले विनायकरावांचे स्थान अद्वितीय आहे. (साभार : मराठी विश्वकोष)

# शास्त्रीय गायक रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा सवाई गंधर्व



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील एक थोर गायक व मराठी रंगभूमीवरील विख्यात गायक-नट म्हणजे रामचंद्र गणेश कुंदगोळकर अर्थात सवाई गंधर्व त्यांची आज जयंती. यानिमित्ताने घेतलेला आढावा...

सवाई गंधर्व यांचा जन्म १९ जानेवारी १८८६ रोजी कुंदगोळ (जि. बेळगाव, कर्नाटक) येथे झाला. त्यांची गायनाची आवड लक्षात घेऊन त्यांच्या वडिलांनी त्यांना १८९७-९८मध्ये बळवंतराव कोल्हटकरांकडे गाण्याची तालीम दिली. पुढे किराणा घराण्याचे प्रवर्तक अब्दुल करीमखाँ यांच्याकडे त्यांनी गायनाची कसून तालीम घेतली (१९००-१९०७). त्याचप्रमाणे निसार हुसेनखाँ, हैदरबक्ष, मुरादखाँ यांच्याकडून त्यांनी चिजांचे शिक्षण घेतले. १९०८मध्ये त्यांनी अमरावतीस 'नाट्यकला प्रवर्तक मंडळी'त गायक-नट म्हणून प्रवेश केला व ते स्त्रीभूमिका करू लागले. त्या काळात बालगंधर्व यांच्या स्त्रीभूमिका अत्यंत लोकप्रिय असतानाही कुंदगोळकरांच्या रूपाने स्त्रीभूमिका करणारा एक नवा गायक-नट रंगभूमीवर अवतीर्ण झाला व अल्पावधीतच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचला. या लोकप्रियतेमुळेच वऱ्हाडाचे नबाब म्हणून प्रसिद्ध असलेले दादासाहेब खापर्डे यांनी अमरावती येथे १९०८ साली त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली व या टोपण नावानेच ते पुढे जास्त ओळखले जाऊ लागले.

सवाई गंधर्व यांचा विशेष लौकिक झाला, तो हरिभाऊ आपटे यांच्या संत सखू नाटकातील सखूच्या भूमिकेमुळे. या लौकिकाच्या पाठबळावरच त्यांनी स्वत:ची 'नूतन संगीत नाटक मंडळी' स्थापन केली व ती पुढे दहा वर्षे चालविली. त्यानंतर 'यशवंत संगीत मंडळी'मध्ये व शेवटी हिराबाई बडोदेकरांच्या 'नूतन संगीत विद्यालया'च्या नाट्यशाखेत अशी स्थित्यंतरे करीत १९३२मध्ये त्यांनी नाट्यजीवनाला कायमचा रामराम ठोकला. या चोवीस वर्षांच्या नाट्यजीवनात त्यांनी केलेल्या सुभद्रा, तारा, संत सखू, कृष्ण इ. भूमिका विशेष गाजल्या, तसेच 'बघुनी उपवनी', 'असताना यतिसन्निध', 'व्यर्थ छळिले' इ. त्यांची नाटयपदे खूपच लोकप्रिय झाली. तुलसीदास नाटकातील त्यांनी गायिलेले 'राम रंगी रंगले मन' हे भजनही अतिशय गाजले.

१९३०नंतर संगीत रंगभूमीची सद्दी संपल्यावर सवाई गंधर्व शास्त्रीय संगीताच्या मैफलींकडे वळले. त्यांचा रंगभूमीवरील समृद्ध अनुभव, कल्पनाशक्तीची उत्तुंग भरारी, जास्त व विविध स्वनरंग वापरण्याची क्षमता व गायनातील समृद्ध भावरंगपट आदी अलौकिक गुणांमुळे त्यांचा संगीताविष्कार समृद्ध व प्रभावी ठरत असे. त्यांची रागाची बढत जास्त पद्धतशीर तसेच तानांमध्ये वैविध्य व लयकारीत आक्रमकता दिसून येई. १९४२मध्ये त्यांना पक्षाघाताचा तीव्र झटका आला व परिणामत: पुढील दहा वर्षे त्यांचे गाणे पूर्णत: थांबले. पुणे येथे १२ सप्टेंबर १९५२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या शिष्यशाखेत गंगुबाई हनगल, भीमसेन जोशी, फिरोज दस्तुर, छोटा गंधर्व, मास्तर कृष्णराव इ. मान्यवर गायक-गायिकांचा समावेश होतो. (साभार : मराठी विश्वकोष)

# विनोदी लेखक चिंतामण जोशी



चिंतामण विनायक जोशी हे सुप्रसिद्ध मराठी विनोदी लेखक होते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १८९२ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे नूतन मराठी विद्यालयात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण झाले. फर्ग्युसन कॉलेजातून बीए (१९१३), एमए (१९१६) झाले. त्यांचा पाली भाषेचा विशेष व्यासंग होता. त्यांनी आरंभी चार वर्षे सरकारी शिक्षणखात्यात माध्यमिक शिक्षक म्हणून काम केले. पुढे १९२०पासून बडोदा कॉलेजात पाली, इंग्रजी आणि मराठी या भाषांचे प्राध्यापक म्हणून काम केले.

'अ मॅन्युअल ऑफ पाली सद्धम्मप्पकासिनी' (संपादक), 'पाली कंकॉर्डन्स' (कोश), 'जातकांतील निवडक गोष्टी' (१९३०), 'शाक्यमुनि गौतम' (१९३५), 'बुद्धसंप्रदाय व शिकवण' (१९६३) ही त्यांची ग्रंथनिर्मिती त्यांच्या पालीच्या व्यासंगाची द्योतक आहे, पण याहीपेक्षा चाळीसांवर पुस्तके लिहून त्यांनी मराठी विनोदाच्या क्षेत्रात जी कामगिरी बजावली ती विशेष महत्वाची होय. विनोदी लेखनाची प्रेरणा त्यांना कोल्हटकर-गडकऱ्यांच्या कोटित्वयुक्त लेखनातून मिळाली व त्याचा ठसा आपणास त्यांच्या प्रारंभीच्या 'एरंडाचे गुऱ्हाळ' (१९३२)मधील लेखन व 'चिमणरावांचे चऱ्हाट'(१९३३)मधील विवाहविषयक लेख यांवर स्पष्ट दिसतो.

जोशी यांच्या कथांवर आधारित 'सरकारी पाहुणे', 'लग्न पाहावं करून'सारखे सिनेमे आणि मुंबई दूरदर्शनवरची मालिका यांनी मराठी माणसांच्या मनात घरं केलं. चिमणराव, गुंड्याभाऊ, काऊ, मोरू, मैना, राघू असे सर्वच कुटुंबीय जणू दर्शकांच्या घरचेच होऊन गेले होते. त्यांच्या चित्रणात अतिशयोक्तीपेक्षा स्वभावोक्तीवर आणि समाजसुधारणेच्या मंडनापेक्षा मानवी स्वभावातील साध्यासुध्या विसंगतींच्या दर्शनावर भर राहिला. त्यांची निवेदनशैलीही मर्मभेदक कोटित्वापेक्षा मार्मिक व स्वाभाविक संवादांनी नटलेली आहे. त्यामुळे त्यांचे लेखन निबंधरूप होण्याऐवजी त्याला ललित कथेचा घाट प्राप्त झाला व त्यातून मध्यमवर्गीयांचे एक अस्सल व स्वयंपूर्ण विश्व साकार झाले. अशा या लेखकाचे २१ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# नवी मुंबईत मराठी भाषेचा जागर

## महापालिकेतर्फे पंधरवड्यात विविधांगी कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने जारी केलेल्या ३१ डिसेंबर २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार १४ ते २८ जानेवारी २०२५ या कालावधीत सर्वत्र 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला असल्याने यावर्षीचा 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अधिक उत्साहाने साजरा होत आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेनेही आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून मान्यवरांच्या व्याख्यानांसोबत अधिकारी, कर्मचारीवृंदाच्या मराठी साहित्यप्रेमाला व प्रतिभेला संधी उपलब्ध करून देत साहित्यविषयक स्पर्धात्मक उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे.

या पंधरवडा कालावधीतील कार्यक्रमांतून अशा अभिजात मराठी भाषेचा प्रचार - प्रसार व्हावा तसेच कार्यालयीन कामकाजातही मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर व्हावा अशाप्रकारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यामध्ये - गुरूवार, दि. १६ जानेवारी २०२५ रोजी, सकाळी ११ वा. शासकीय कामकाजात सुयोग्य मराठीचा वापर या अनुषंगाने 'कार्यालयीन टिप्पणी व



मराठी सुलेखन' या विषयावर महाराष्ट्र शासनाचे निवृत्त उपसचिव वसंत चौधरी यांचे माहितीपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

मराठी कवितेचा समृद्ध वारसा जपत नवी मुंबई महानगरपालिकेचे अनेक अधिकारी, कर्मचारी कविता लिहितात. त्यांच्या काव्यगुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील प्रतिभादर्शन घडावे यादृष्टीने नमुंमपा अधिकारी - कर्मचारी यांचेकरिता सोमवारी (दि.२०) 'स्वकवितावाचन स्पर्धा' आयोजित करण्यात आलेली आहे.

मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याचा आनंद व अभिमान व्यक्त करीत सुप्रसिध्द साहित्यिक, व्याख्याते डॉ.महेश केळुसकर यांचे 'मायबोली अभिजात मराठी' या विषयावर व्याख्यान मंगळवारी (दि.२१) आयोजित करण्यात आलेले आहे.

मराठी साहित्य संपदेत विविध चरित्रे - आत्मचरित्रे यांचे स्थान बहुमोल आहे. त्यांच्यामुळे जीवनाकडे बघण्याची सकारात्मक दृष्टी तयार होते, तसेच ती अनुभव समृध्द करतात. हे लक्षात घेत नमुंमपा अधिकारी - कर्मचारी यांचेकरिता बुधवारी (दि.२२) 'मला भावलेले चरित्र - आत्मचरित्र' या विषयावर 'अभिवाचन स्पर्धा' आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये अधिकारी, कर्मचारी त्यांना भावलेल्या चरित्र - आत्मचरित्राची संक्षिप्त माहिती देत त्या पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन करतील, जेणेकरून ते ऐकून ते पुस्तक वाचण्याची उत्सुकता श्रोत्यांच्या मनात उत्पन्न होईल.

आपल्या कथा, कादंब-या, नाटके आणि ललित लेखनाने मराठी साहित्यविश्व समृध्द करणाऱ्या सुप्रसिध्द साहित्यिक जयवंत दळवी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्त सुप्रसिध्द लेखिका डॉ.निर्मोही फडके यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'स्मरणखुणा : जयवंत दळवी' हा विशेष कार्यक्रम शुक्रवार, २४ जानेवारी रोजी सायं. ४ वा. संपन्न होत आहे. यामध्ये त्यांच्यासमवेत नामांकित अभिनेते योगेश केळकर व अभिनेत्री वंदना गुजरे हे कलावंत जयवंत दळवी यांच्या साहित्याचे अभिवाचन करणार आहेत.

याशिवाय मंगळवार, २८ जानेवारी रोजी, सकाळी ११ वा. मराठी भाषेला लाभलेल्या अभिजात भाषेच्या दर्जास अनुसरून नमुंमपा अधिकारी - कर्मचारी यांची 'अभिजात मराठीची पुढील वाटचाल' या विषयावर 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी - कर्मचारीवृंदासाठी आयोजित विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता त्या त्या स्पर्धा दिनांकाच्या आधीच्या कार्यालयीन दिवसापर्यंत सहभाग इच्छुक अधिकारी - कर्मचारी यांनी आपली नावे माहिती व जनसंपर्क विभागात नोंदवावयाची आहेत. याबाबतच्या अधिक माहितीसाठी ८१६९८१२९९७ / ८६८९८११५८२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे सूचित करण्यात आलेले आहे.

> मराठीचा जागर करताना महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त अभिनव कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे कार्यक्रम अनुभवण्यासाठी साहित्य व भाषाप्रेमी नवी मुंबईकर नागरिक रसिक म्हणून सहभागी होऊ शकतात, त्यांचे महापालिकेच्या वतीने स्वागत असेल.
>
> **-सुनील पवार,** अतिरिक्त आयुक्त व कार्यक्रमांचे मुख्य संयोजक




## गुणवंत विद्यार्थी गौरव कार्यक्रमात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा सन्मान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघरच्या विद्यार्थिनी अनन्या अरोरा हिला तिच्या अप्रतिम शैक्षणिक यशाबद्दल गौरविण्यात आले. मार्च २०२४मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत (१०वी) परीक्षेत अनन्या अरोराने रायगड जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवत शाळेचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले.

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महादेव नाळे व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बसवाड यांच्या हस्ते अनन्याला गुणवंत विद्यार्थी म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले. या वेळी अनन्याच्या शैक्षणिक कौशल्याचे व मेहनतीचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती राज अलोनी यांनी सांगितले की, अनन्या अरोराने शाळेच्या शैक्षणिक परंपरेला पुढे नेण्याचे मोठे काम केले आहे. तिचा हा यशस्वी प्रवास इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही तिच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

अनन्याच्या यशस्वी भवितव्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यासोबतच रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, सचिव एस. टी. गडदे आणि मुख्याध्यापिका राज अलोनी यांनीही तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन शिक्षण संकुलात बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभाग मार्फत पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात



आयोजित केलेल्या एचएससी विद्यार्थी मार्गदर्शन व्याख्यानात प्रा. तुषार बागवे यांनी विद्यार्थ्यांना पेपर लिहिताना शॉर्टकट न करण्याचा सल्ला दिला.

या वेळी उपस्थित नवी मुंबई महापालिका उपायुक्त किसनराव पलांडे यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना अभ्यासाच्या बाबतीत कोणतीही तडजोड करु नये असा सल्ला दिला. महापालिकेच्या माध्यमातून आपणास ही सक्षम शिक्षणासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे त्याचा तुम्ही फायदा करून घ्या.

प्रश्नोत्तर स्वरूपात व्याख्यान देताना प्रा. तुषार बागवे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक शंकेचे निरसन केले. माईंड मॅपिंग, समरी, ॲप्रीसिएशन, पोएटिक डिव्हायसेस आणि क्रिएटीव्ह रायटिंग व ग्रामर, इंटरव्हिव्ह क्वेश्चन्स, ई-मेल रायटिंग या भागावर विशेष जोर देण्यात आला.

पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी दादासाहेब भोसले, प्रशांत कांबळे, मुख्याध्यापक गोरख कदम, पर्यवेक्षिका शोभा लवटे तसेच शिक्षक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

## महापारेषणकडून उच्च क्षमतेचे कंडक्टर लावण्याचे काम पूर्ण



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगराच्या वीजमागणीत सातत्याने वाढ होत असताना त्या मागणीस पूरक असणाऱ्या महापारेषणच्या ४०० के. व्ही. कळवा-पडघा वाहिनी क्र. १ चे सध्याचे जुने कंडक्टर बदलून त्याऐवजी नवीन उच्च क्षमतेचे कंडक्टर लावण्याचे महत्त्वाकांक्षी काम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून (महापारेषण) अवघ्या १७ दिवसांत पूर्ण केले आहे. ५०० पेक्षा अधिक कुशल कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विक्रमी वेळेत नुकतेच हे काम पूर्ण झाले. यामुळे वाहिनी क्र. १ आणि वाहिनी क्र. २ या दोन्ही वाहिन्या मिळून २००० मेगावॅटऐवजी ४ हजार २०० मेगावॅट इतक्या विजेचे आता वहन करणे शक्य होणार आहे.

या वाहिनीचे यापूर्वीच २७ कि.मी. चे काम २०२३-२४ मध्ये पूर्ण झाले होते. उर्वरित २३ कि.मी. चे काम महापारेषणने युध्दपातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन केले. या वाहिनीच्या कामात रेल्वे, हायवे व उच्च विद्युत वाहिन्यांचे क्रॉसिंग, डोंगराळ भाग, वनजमीन तसेच ठिकठिकाणी स्थानिक ग्रामस्थांचा विरोध यासारखी मोठी आव्हाने होती, परंतु या सर्व अडचणींवर मात करून महापारेषणने या वाहिनीच्या कामात गतीशीलता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व विविध भागधारकांशी सकारात्मक सुसंवाद साधून २३ कि.मी. चे वरील काम तातडीने पूर्ण केले.

हे काम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली संचालक (संचलन) सतीश चव्हाण व वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता महेश भागवत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या कामाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी कळवा मंडलाचे अधीक्षक अभियंता विजय आवारे, कार्यकारी अभियंता संतोष भुजबळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुखदेव पनवार यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच यासाठी मेसर्स अपार इंडस्ट्रिज लिमिटेड यांचेही मोलाचे योगदान लाभले.



## अक्षीकर विद्या संकुलात वार्षिक समारंभ

**उरण : बातमीदार**

कै गो.ना.अक्षीकर विद्या संकुलातील जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये वार्षिक समारंभ दिवस साजरा करण्यात आला. या वेळी प्रमुख अतिथी जितेंद्र मिसाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण,

राखी धिंग्रा मॅडम फाउंडर अँड चेअरमन पीस अँड एज्युकेशन ट्रस्ट हे मान्यवर उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश म्हात्रे बोर्ड ऑफ डायरेक्टर जी. ई. आय. दादर यांनी भूषविले.

माजी शालेय समिती अध्यक्ष सदानंद गायकवाड, शालेय समिती सदस्य, संकुलातील मुख्याध्यापक, माजी सदस्य, मुख्याध्यापक -शिक्षक आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. एकंदरीत मोठ्या उत्साहात, उत्तम प्रतिसादात कार्यक्रम झाला.

## रसायनी ते श्रीक्षेत्र महड पायी दिंडी सोहळा उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी ते श्री क्षेत्र वरदविनायक महड पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन या दिंडीचे संस्थापक मारुती भागाजी खाने यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात पार पडला.

सालाबादप्रमाणे नववर्षाच्या पहिल्या येणाऱ्या, संकष्ट चतुर्थीला ही पायी दिंडी श्री गणेशभक्तांच्या उपस्थितीत पार पडते. या पायी दिडीला मोहोपाडा डोंगरी विभागातून सुरुवात करण्यात येते. यावेळी परिसरातील श्री गणेश भक्तांसह वारकरी हरिनामाच्या गजरात पायी दिडींत तल्लीन होवून महिलावर्ग डोक्यावर तुळशीवृंदावन



घेऊन पायी दिंडीत हरिनामाच्या तालावर नाच करतानाचे दृष्य पहावयास मिळाले. हि पायी दिंडी वासांबे ते मोहोपाडा ग्रामपंचायत येथील श्री गणेश मंदिरासमोर येताच दींडींचे स्वागत करण्यात आले. यानंतर ही दिंडी मोहोपाडा गावातून जाताना ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे यांनी पालखीतील श्रीगणेशाचे मनोभावे दर्शन घेवून ओवाळणी केली.

यानंतर मोहोपाडा शिवाजी चौकातून पुढे नवीन पोसरी येथे फराळाचा कार्यक्रम झाला. यानंतर टाके देवी दांडफाटा, चौक, कलोते बापदेव मंदिर, खालापूर येथे फराळ होवून रात्री ८ वाजता श्री क्षेत्र वरदविनायक महड येथे पायी दिंडी दाखल झाली. श्री वरदविनायकाचे दिंडीतील सर्वांनी मनोभावे दर्शन घेवून पायी दिंडीची सांगता केली. या पायी दिंडीत रसायनी सह आसपासच्या परिसरातील हभप महाराजांसह रसायनीकर हजर होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मारुती भागाजी खाने यांच्यासह तरुणांवर्गांने अथक परिश्रम घेतले.



**पनवेल : उलवे नोड भाजप चिटणीस सुहास गोंधळी यांची कन्या शौया गोंधळी हिला वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी बाबाराव देशमुख, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, निलेश खारकर, भार्गव ठाकूर, दीपक गोंधळी, शैलेश भगत आदी उपस्थित होते.**

### क्लिक...क्लिक...!



**वाराणसी : श्रीक्षेत्र काशी येथील गंगा नदी घाटावर रात्री भव्य आरती करण्यात येते. या वेळी देशभरातून भाविक येत असतात. हे दृश्य विलोभनीय असते.** (छाया : सुधीर नाझरे)

## 'रोटरी'मार्फत विस्टा फूड्सद्वारे केमोथेरपीसाठी आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत विस्टा फूड्सच्या सी एस आर फंडा द्वारे पनवेल परिसरातील कॅन्सर रुग्णांना कमीत कमी खर्चात केमोथेरपीची ट्रिटमेंट मिळण्यासाठी डॉ. सलिल पाटकर यांच्या इंडियन कॅन्सर ट्रीटमेंट सेंटरचे Affordable Chemotherapy Centerला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

या वेळी विस्टा फूड चे मार्गदर्शक सल्लागार चंद्रशेखर सोमण यांनी मार्गदर्शन करताना त्यांनी अनेक वर्षे, अनेक रुग्णांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली असून यापूर्वी मागील वर्षी १९० कॅन्सर रुग्णांना याचा फायदा या सेंटर द्वारे करून दिला या प्रामाणिक आरोग्य सेवेबाबत डॉ. सलिल पाटकर यांचे कौतुक करून आमच्या सी एस आर ची योग्य ठिकाणी उपयोग वापर होत असल्याचे समाधान व्यक्त केले व ५ लाखाचा चेक पुढील सेवे साठी सुपूर्द केला. रोटरी प्रांत ३१३१चे



माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांनी मार्गदर्शन करताना रोटरी च्या माध्यमातून विविध प्रकल्पांना विस्टा फूड तर्फे मदत केली जाते व त्याचा विनियोग योग्य प्रकारे कसा केला जातो हे सांगितले तसेच चंद्रशेखर सोमण यांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी डॉ. सलिल पाटकर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, माजी अध्यक्ष डॉ. आमोद दिवेकर, डॉ. लक्ष्मण आवटे, संतोष घोडिंदे, पुढील नियोजित अध्यक्ष अनिल ठकेकर, डॉ. सुरेश मोरे, डॉ. मिलिंद घरत, योगेश महाजन, ॲड. पूर्णिमा राऊत यांचे सह ॲनस् वृषाली पोटे, ज्योती गडगे, निशिगंधा पाटील, सारिका ठकेकर आदी उपस्थित होते.

# मुरुडच्या विकासासाठी सामंजस्य करार

## महिंद्रा लाईफस्पेस व राज्य सरकार करणार कार्यवाही

**मुरुड : प्रतिनिधी**

मुंबईच्या महिंद्रा लाईफस्पेस डेव्हलपर्स लि. आणि राज्य सरकार यांच्यात रायगड जिल्ह्यातील मुरुड जंजिरा हे जागतिक दर्जाचे पर्यटन ठिकाण म्हणून विकसित करणार आहे. यासाठी एका सामंजस्य करारावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील एका बैठकीत स्वाक्षरी करण्यात आली असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून कळते. या वेळी महिंद्रा समूहाचे अध्यक्ष आनंद महिंद्रा हेही उपस्थित होते.

महाराष्ट्र पर्यटन धोरणांतर्गत हा प्रकल्प विकसित करण्यात येणार असून मेडिकल पर्यटन आणि वेलनेस क्षेत्रातील ही आतापर्यंतची सर्वांत मोठी गुंतवणूक आहे. सुमारे पाचशे कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून त्यातून जवळपास सहा हजार रोजगार निर्माण होणार आहेत. मुरूड तालुक्यातील



होतकरू तरुणांना ही एक सुवर्णसंधी लवकरच उपलब्ध होणार आहे.

मुरूड तालुक्यातील वावडूंगी ग्रामपंचायत हद्दीतील महालोर या गावात मेडिकल इको टुरिझम प्रोजेक्ट या अगोदर होणार होता. काही अपरिहार्य कारणामुळे हा प्रोजेक्ट रद्द झाला, परंतु आता नव्याने मोठा प्रोजेक्टवर सही झाल्याने स्थानिक तरुणांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

मुरुड हा पर्यटन तालुका असल्याने येथे पर्यटकांना फिरण्यासाठी विविध प्रेक्षणीय स्थळे असून याचा अधिक विकास करून ही स्थळे शोभनिय व पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त विकसित करून पर्यटक मोठ्या संख्येने मुरुड तालुक्यात कसे येतील याकडे सर्वाधिक जास्त लक्ष देण्यात येणार आहे.

मुरुड तालुक्यात दरवर्षी सात लाख पर्यटक येत असता. त्यामध्ये सर्वाधिक काशीद समुद्र किनारा, मुरुड समुद्र किनारा, जंजिरा किल्ला आदी ठिकाणी भेट देत असतात. पर्यटकांच्या माध्यमातून स्थानिकांना मोठा स्वयंरोजगारसुद्धा प्राप्त झाला आहे.

मेडिकल पर्यटन आणि वेलनेस क्षेत्रातील पर्यटन असल्याने मुरुड तालुक्यातील विविध ठिकाणी असणारी पर्यटनस्थळे विकसित करण्याबरोबरच औषधी वनस्पती लागवड व वैद्यकीय क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या वनस्पती यांची लागवड यावरसुद्धा भर देण्यात येणार असून तालुक्यातील वनस्पती लागवड क्षेत्रात वृद्धी करण्यात येणार असून हिरवळीचे क्षेत्र वाढ होणार असून वृक्ष लागवडीलादेखील महत्त्व प्राप्त होणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाबाबत सर्वत्र उत्सुकता असून लवकरच हा प्रकलप कार्यान्वित होणार आहे.

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये रस्ता सुरक्षा अभियान कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे.बी सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये रायगड जिल्हा वाहतूक शाखा यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ७० विद्याथी सहभागी झाले होते.

माणगाव येथील वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय पवार, बीट मार्शल कैलास पवार व ट्रॉफिक पोलीस शिवराज बांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रस्ता सुरक्षा अभियान हे दरवर्षी जानेवारी महिन्यात राबविण्यात येते. यामध्ये नागरिकांमध्ये, युवावर्गात व वाहनचालकांमध्ये जनजागृती केली जाते तसेच रस्ता सुरक्षा सप्ताहामध्ये वर्षभरात अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या तसेच उल्लेखनीय कामगिरी



करणाऱ्या नागरिकांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येते, असे पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांनी सांगितले.

विना लायसन्स वाहन चालवणे, अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे, लायसन्सजवळ नसणे, विना हेल्मेट दुचाकी चालवणे, सिटबेल्ड न लावता वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईल वापरणे, मद्यपान करून गाडी चालवणे, गाड्यांना काळ्या काचा लावणे, ट्रिपल सीट गाडी चालवणे या गुन्ह्यांबद्दल असणारी शिक्षा व दंड याबद्दल सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेस प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी, ग्रंथपाल अमित बाकाडे, डॉ. जगदीश शिगवण, डॉ. नितीन मुटकुळे, प्रा. अशोक मोरे, प्रा. भारत पवार,प्रा.सायगावकर, प्रा. मांडवकर व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रगतशील शेतकरी मेघेश भगतकडून तंत्रज्ञानाच्या वापर करून कलिंगड पीक

## रोहा गटविकास अधिकाऱ्यांनी दिली शिवारास भेट

**धाटाव : प्रतिनिधी**

प्रगतशील शेतकरी मेघेश देवजी भगत (रा. लाढंर) यांनी जवळपास पाच एकरमध्ये गोल्डन जातीच्या कलिंगड बियाणे लावले होते. हे पीक घेण्यासाठी जवळपास ८० दिवस मेहनत करावी लागली व साधारणपणे अडीच लाख रुपये खर्च करावे लागले. तब्बल ८० दिवसानंतर ७० टन तयार माल तयार झाला असून अलिबाग, मुरूड, रोहा या भागात विकला जात आहे.

युवा शेतकऱ्याच्या शेतात रोहा पंचायत समितीचे प्रभारी गट विकास अधिकारी महादेव शिंदे, कृषी विस्तार अधिकारी रणजीत लवटे, विस्तार अधिकारी महारुद्र फरतडे, सुनील गायकवाड यांनी जाऊन पाहणी केली व मेघेश भगत यांचे कौतुक केले.

या उत्पादनातून सुमारे आठ ते साडेआठ लाख रुपये नफा मिळणार आहे. यंदा उत्पादन अत्यंत चांगले आहे. त्यामुळे आनंद आहे, असे भगत यांनी सांगितले.



# भुईमूग समूह प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिकांतर्गत शेतकरी प्रशिक्षण

**रोहे : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अधिनस्त कृषि विज्ञान केंद्र रोहामार्फत बारसगाव येथे भुईमूग लागवड तंत्रज्ञान व काढणीपश्चात व्यवस्थापन या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मनोज तलाठी, डॉ. प्रमोद मांडवकर, जीवन आरेकर व सुधाकर पाध्ये उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बारसगावचे सरपंच सोनल उत्तेकर आणि किसान क्रांती संघटनेचे अध्यक्ष टी.एस. देशमुख व कृषि विज्ञान केंद्राचे समिती सदस्य महिपत मांजरे उपस्थित होते.

डॉ. प्रमोद मांडवकर यांनी प्रास्ताविक करताना केंद्र




शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा मोहिमेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या गळीतधान्य समूह शेती उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले व समूह शेतीविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. मनोज तलाठी यांनी भुईमूग बियाणे निवड व सुधारित लागवड तंत्रज्ञान या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. भुईमूग बीजप्रक्रिया व पिकावरील कीड व रोग आणि त्यांचे नियंत्रण याविषयी जीवन आरेकर यांनी मार्गदर्शन केले व किटकनाशके हाताळताना घ्यावयाची काळजी तसेच जैविक किटकनाशकांची माहिती दिली. भुईमूग हे तेलबियामधील उत्कृष्ट असे पीक असून भुईमूगाची काढणीसाठी उपयुक्त यंत्रे व काढणी पश्चात व्यवस्थापनामध्ये तेल निर्मिती याविषयी सुधाकर पाध्ये यांनी माहिती दिली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना टी. एस. देशमुख यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या या समूह प्रथमदर्शी प्रात्यक्षिकांच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती कृषी विभागामार्फत वेळेत मिळावी, अशी आशा व्यक्त केली.

कृषी विभाग महाडचे पर्यवेक्षक श्री. नरोटे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली व यामध्ये सहभागाविषयी आवाहन केले. यानंतर सर्व शेतकऱ्यांसमवेत शास्त्रज्ञांनी भुईमूग प्रात्यक्षिक लागवड प्रक्षेत्रास भेट दिली व शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दीपक सणस यांनी केले. या कार्यक्रमास बारसगाव, आंबेशिवथर, कुंभेशिवथर व वरंध परिसरातील ७० शेतकरी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता बारसगावचे प्रगतशील शेतकरी नारायण उत्तेकर व त्यांचे सहकारी यांनी विशेष प्रयत्न केले.

# निजामपुरात मोफत रक्त तपासणी शिबिराला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

निजामपूर येथील जमातुल मुस्लिमीन मस्जिद व मस्जिद मोहल्ला या संस्थेच्या वतीने बसस्थानकाजवळ सर्व समाजातील गरजू, गरीब नागरिकांसाठी मोफत रक्त तपासणीच्या विविध चाचण्या करण्यात आल्या. या शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन निजामपूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बाळाराम दबडे यांच्या हस्ते व माजी सरपंच हमजाभाई जालगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मोहन कोलवणकर, कासीम दाऊद जालगावकर, माजी अध्यक्ष इस्माइल लोखंडे, पेट्रोल रिक्षा संघटना लियाकत दळवी,



युवा कार्यकर्ता मैनुद्दीन परदेशी, दोनही मोहल्याचे मुस्लीम समाज अध्यक्ष मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अ. गणी ह. जालगावकर, छोटा मोहल्ला अध्यक्ष इलियास सांगळे, मज्जीद मोहल्ला उपाध्यक्ष अ. रज्जाक लोखंडे, छोटा मोहल्ला उपाध्यक्ष मुस्तकीम सांगळे, मज्जीद मोहल्ला सेक्रेटरी मुराद जालगावकर, कमिटी मज्जीद मोहल्ला अध्यक्ष शौकत उस्मान राऊत डॉ. फरजाना, डॉ. अहिरे, देवेंद्र मेहता, मिनीडोअर रिक्षा संघटना अध्यक्ष आत्माराम भोगावले तसेच सर्व कमिटी सदस्य व मुस्लीम, हिंदू बांधव उपस्थित होते.

या शिबिरात सीबीसी, ब्लड शुगर रॅन्डम, ब्लड ग्रुप, मलेरिया आणि टायफाईड तसेच विविध मोफत चाचण्या करण्यात आल्या. या खर्चिक व न परवडणाऱ्या महागड्या चाचण्या संस्थेने मोफत उपलब्ध करून दिल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळाला आहे.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी ही सामाजिक संस्था आगामी काळात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थांना मार्गदर्शन शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर असे विविध उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले.

# संशोधन स्पर्धेत समृद्धी मोतेचे यश

**नागोठणे : बातमीदार**

लोणरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात झालेल्या १७व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय आविष्कार संशोधन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने सलग सहाव्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी पटकावली. यात कोएसोच्या नागोठणे येथील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाची तृतीय वर्ष बीएस्सीची विद्यार्थिनी समृद्धी मोते हिने कांस्यपदक पटकाविले.

समृद्धीला शिक्षक आक्रोश पाटील व डॉ. स्मिता मोरबाले यांचे मार्गदर्शन लाभले.

कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील, कार्यवाह ॲड. पल्लवी पाटील, वरिष्ठ मार्गदर्शक संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, सहाय्यक कार्यकारी अधिकारी अनिता पाटील व सर्व संचालक मंडळाने समृद्धीचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दिनेश भगत, डॉ. संदेश गुरव, डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समृद्धी व आविष्कार संशोधन टीमचे अभिनंदन केले.



# उसर खुर्द विद्यालयात विभागीय स्पर्धा

**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेच्या संकल्पनेतून उसर खुर्द येथील अभिनव ज्ञानमंदिर विद्यालयात आविष्कार २०२५ कल्पकतेकडून कृतीकडे या उपक्रमांतर्गत विभागीय स्पर्धे चे आयोजन करण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यां मधिल कौशल्य व विज्ञानाचे दृष्टिकोनातून ज्ञानवर्धक अशा या उपक्रमाचे उद्‌घाटन रायगडभूषण पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ पत्रकार रवींद्र कुवेसकर, तळेगावच्या सरपंच रेणुका चाळके, शालेय समिती निमंत्रित सदस्य शांताराम नटे, सामाजिक कार्यकर्ते नामदेव काप तसेच शाळेचे मुख्याध्यापक सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत रायगड विभागातील शाळांमधील सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी एकूण १६ प्रकल्पांचे सादरीकरण केले. यात एकूण ३१



विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रकल्पांचे परीक्षण पडवण व बोरघर हायस्कूलच्या महाजन व शिंदे या शिक्षकांनी केले. हे प्रदर्शन पाहण्यासाठी परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी आवर्जुन उपस्थित होते. या स्पर्धेत इयत्ता सहावी ते नववी गटातून विभाग स्तरावर प्रथम आलेले चार गट पुढील संस्था पातळी वरील स्पर्धेसाठी निवडण्यात आले.

यामध्ये अभिनव ज्ञान मंदिर उसर–खुर्द इयत्ता सहावी तसेच माध्यमिक विद्यामंदिर रातवड सातवीतील विद्यार्थ्यांच्या औषधी वनस्पतीचे उपयोग, माध्यमिक विद्यामंदिर रातवडच्या आठवीतील अपारंपारिक उर्जास्त्रोत प्रकल्प तसेच अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द शाळेच्या इयत्ता नववीतील पुनर्वापर व पुनर्प्रक्रिया (एकात्मिक शेती) या विभाग स्तरावर प्रथम आलेल्या चार गटांचे प्रकल्पांना आता संस्था पातळीवरील स्पर्धेसाठी निवडण्यात आले आहे.

# नम्रता मालकर खेळ पैठणींचा स्पर्धेच्या विजेत्या

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सांगवी तर्फे वासरे येथे श्री सोमजाई माता उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा झाला. या उत्सवानिमित्त जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या पुढाकारातून विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी आयोजित खेळ पैठणीचा अर्थात होम मिनिस्टरला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. चौक तळवली येथील नम्रता मालकर या प्रथम क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.

भारती घारे आणि माजी सरपंच नमिता घारे यांनी महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



सावल्यांची जणू सावली मालिका फेम सावली अभिनेत्री प्राप्ती रेडकर, सहकुटुंब सहपरिवार फेम अवनी अभिनेत्री साक्षी गांधी यांनी हा खेळ पैठणीचा अर्थात होम मिनिस्टर या कार्यक्रमाची रंगत वाढवली, तर निवेदक निलेश पापत यांनी कार्यक्रम बहारदार केला.

खेळ पैठणीचा अर्थात होम मिनिस्टर या खेळात सहभागी महिलांमधील प्रथम १० विजेत्या महिलांना मानाची पैठणी आणि बक्षिसे देण्यात आली, तर उत्तेजनार्थ २५ महिलांना सोन्याची नथ आणि प्रेशर कुकर देण्यात आला. प्रथम क्रमांच्या विजेत्या नम्रता मालकर यांना मानाची पैठणी आणि फ्रिज, व्दितीय संतोषी मिरकुडे (नेरळ मोहाचीवाडी) यांना पैठणी आणि टीव्ही, तृतीय श्रेया कुंभार (खांडपे) यांना पैठणी आणि वॉशिंग मशीन देण्यात आली.

### महिलांनी धरला नृत्यावर ठेका!

अभिनेत्री प्राप्ती रेडकर व साक्षी गांधी यांच्या उपस्थितीने हा खेळ पैठणीचा कार्यक्रमाला रंगत आली. या वेळी संगीताच्या तालावर अभिनेत्रींनी नृत्य सादर केले. उपस्थित महिलांनीदेखील संगीताच्या तालावर नृत्याचा ठेका धरला. महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. परिसरातील महिलांनी या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेतला.

# वरवरचे न वाचता सखोल वाचन करावे –अरुणा भागवत

## ■ वाचन पंधरवड्यानिमित्त मोरे महाविद्यालयात साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रम अंतर्गत लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात पोलादपूर येथील प्रसिद्ध बालसाहित्यकार आणि राज्य पुरस्कार प्राप्त कथा लेखिका अरुणा भागवत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

आपल्या मनोगतात लेखिका भागवत यांनी वाचनाचे विविध फायदे कथन करीत असताना विद्यार्थ्यांनी फक्त वरवरचे न वाचता करता सखोल वाचन करावे तसेच आजच्या मोबाईलच्या युगामध्ये प्रतिलिपीसारख्या ॲप्सचादेखील त्यासाठी उपयोग करावा, असे आवाहन केले. या वेळी भागवत यांनी त्यांचा वाचन व लेखन प्रवासाबद्दल माहिती दिली.



आपल्याला लाभलेली उत्कृष्ट शैक्षणिक पार्श्वभूमी तसेच लहानपणापासूनच झालेले वाचन संस्कार यातून निर्माण झालेली वाचनाची आवड आणि विशेषतः प्रसिद्ध लेखिका विजया वाड यांच्या पुस्तकांमधून आपल्याला प्रेरणा मिळाल्याचे अरुणा भागवत यांनी या वेळी नमूद केले. त्यांनी असंख्य लेखकांच्या साहित्याचे वाचन करीत असतानाच आपणही आपल्याला येणारे दैनंदिन अनुभव प्रवासातील, अनुभव याबद्दल काहीतरी लिहावे अशी प्रेरणा प्राप्त झाली आणि त्यातूनच पुढे आपल्या हातून विविध बालनाट्य, कथासंग्रह यांचे लिखाण होत गेले असे सांगितले. या वेळी विद्यार्थीवर्गाने विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरेदेखील दिली तसेच लिहिलेली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयास सप्रेम भेट म्हणून प्रदान केली.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांनी तरुण पिढीने रोज कमीत कमी पाच ते दहा पाने अवांतर वाचन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. प्रारंभी मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र सोमोशी यांनी महाविद्यालयात आयोजित विविध उपक्रमांची माहिती दिली. मराठी विभाग प्रमुख डॉ. रवींद्र सोमोशी यांनीही मनोगत व्यक्त केले. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मंगेश गोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राम बरकुले यांनी आभार मानले.

# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताचा संघ जाहीर

## शुबमन गिल उपकर्णधारपदी, शमीचे पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५साठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय भारतीय संघ जाहीर केला आहे. हाच संघ इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार आहे. या संघाच्या उपकर्णधारपदी युवा खेळाडू शुबमन गिलची वर्णी लागली आहे. त्याचबरोबर इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान जसप्रीत बुमराह खेळणार नसल्याने त्याच्या जागी हर्षित राणा खेळणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात काही बदल करण्यात आले आहेत, ज्यामध्ये मोहम्मद शमी खूप दिवसांनी पुनरागमन झाले आहे. तो २०२४च्या विश्वचषकानंतरपासून दुखापतीमुळे संघातून बाहेर होता.

या वेळी चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तान आणि दुबईमध्ये हायब्रीड मॉडेल अंतर्गत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना १९ फेब्रुवारीला यजमान पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात कराची येथे होणार आहे. भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील आपल्या मोहिमेची सुरुवात बांगलादेशविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. उभय संघांमधील सामना २० फेब्रुवारी रोजी दुबईत होणार आहे.



भारत आणि पाकिस्तान यांच्यात २३ फेब्रुवारीला सामना होणार आहे. टीम इंडिया २ मार्चला न्यूझीलंडशी भिडणार आहे. जर भारताने गट सामन्यांमध्ये अव्वल स्थान कायम राखले आणि पुढील फेरीत प्रवेश केला तर ४ मार्च रोजी उपांत्य फेरीचा सामना खेळेल. या स्पर्धेचा अंतिम सामना ९ मार्च रोजी होणार आहे.

**भारतीय संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा.

### यशस्वीला संधी, सिराजला डच्चू!

विशेष म्हणजे यशस्वी जैस्वालला पहिल्यादांच वनडे संघात स्थान मिळाले आहे. याचबरोबर वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला संघातून डच्चू देण्यात आला आहे. ऋषभ पंत, लोकेश राहुल आणि संजू सॅमसन या तिघांपैकी संजूचा पत्ता कट झालाय. स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादवसह मोहम्मद शमी फिट आहेत का? विजय हजारे ट्रॉफीत दमदार कामगिरी करणाऱ्या करुण नायरला टीम इंडियात कमबॅकची संधी मिळणार का? असे प्रश्न होते. यात बुमराह, कुलदीप व शमीसंदर्भात दिलासा मिळाला, पण करुणचा विचार झालेला दिसत नाही.

# राष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशीपमध्ये ‘सीकेटी’च्या श्रेया मुरकरला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशनतर्फे आयोजित चॅम्पियनशिप २०२५मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाची विद्यार्थिनी श्रेया महेंद्र मुरकर हिने सुवर्णपदक पटकाविले.

स्पर्धा नुकतीच नवी दिल्लीतील केशवपुरम येथील राणी झासी स्टेडियमवर पार पडली. या स्पर्धेसाठी प्राथमिक फेरी रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे झाली. तेथे श्रेयाची राष्ट्रीय स्तरासाठी निवड करण्यात आली होती. राष्ट्रीय स्पर्धेत श्रेयाने सुवर्णपदक जिंकले.

या यशाबद्दल संस्थेचे




चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्रेयाचे अभिनंदन केले.

# चिंतामणी चषक कबड्डी स्पर्धेत आता उपांत्य फेरीचा थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

लायन्स स्पोर्टस्, गुड मॉर्निंग, जय भारत क्रीडा, गोलफादेवी सेवा यांनी चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या सातव्या चिंतामणी चषक कबड्डी स्पर्धेत पुरुष प्रथम श्रेणी गटाची उपांत्य फेरी गाठली, तर हिंदमाता सेवा, शिवमुद्रा प्रतिष्ठान, अमर सेवा, नवोदित संघ यांनी कुमार गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला.

लायन्स स्पोर्टस् विरुध्द जय भारत, गुड मॉर्निंग विरुध्द गोलफादेवी सेवा अशी प्रथम श्रेणी पुरुषांत, तर हिंदमाता सेवा विरुध्द शिवमुद्रा प्रतिष्ठान, अमर सेवा विरुध्द नवोदित संघ अशी कुमार गटात उपांत्य लढत होईल.

मुंबई, चिंचपोकळी येथील सदगुरू भालचंद्र महाराज क्रीडांगणावर झालेल्या पुरुषांच्या उपांत्यपूर्व सामन्यात लायन्सने विजय क्लबचा



दुबळा प्रतिकार ३३-१८ असा सहज मोडून काढला.

गुड मॉर्निंगने सिद्धीप्रभा फाऊंडेशनवर ४९-१७ असा विजय मिळविला. विश्रांतीपूर्वी दोन लोण देत २७-०८ अशी आघाडी घेणाऱ्या गुड मॉर्निंगने नंतरही त्याच जोशाने खेळ करीत आणखी दोन लोण देत ३२ गुणांच्या मोठ्या फरकाने विजय साकारला. याच गटात जय भारतने चुरशीच्या लढतीत शिवशक्ती मंडळाचे आव्हान २९-२६ असे संपुष्टात आणत उपांत्य फेरी गाठली. पहिल्या डावात दोन्ही संघ ११-११ अशा बरोबरीत होते. दुसऱ्या डावात जय भारतने लोण देत आपला विजय निश्चित केला.

शेवटच्या सामन्यात गोलफादेवीने बंड्या मारुतीचा प्रतिकार २७-२३ असा मोडून काढला. पूर्वार्धात ११-०८ अशी आघाडी घेणाऱ्या गोलफादेवीने उत्तरार्धात संयमाने खेळ करीत आपला विजय साकारला. गोलफादेवीने पूर्वार्धात दोन अव्वल पकड व उत्तरार्धात लोण देत आपला विजय निश्चित केला.

कुमार गटात हिंदमाता मंडळाने वीर संताजीला ४२-२६ असे नमवित उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात शिवमुद्रा प्रतिष्ठानने शिवनेरीचा ४७-३५ असा पाडाव केला. सुरुवातीला दोन लोण देत विश्रांतीला २७-१० अशी आघाडी घेणाऱ्या शिवमुद्राने नंतर सावध खेळ करीत हा विजय मिळविला.

काळाचौकीच्या अमर मंडळाने आकांक्षा मंडळाचा ४१-३२ असा पराभव करीत आपली आगेकूच सुरूच ठेवली. याच गटात शेवटच्या सामन्यात नवोदित संघाने अंकुर स्पोर्टस्‌ला ४३-३५ असे नमविले. पूर्वार्धात १९-१८ अशी आघाडी घेणाऱ्या अंकुरला शेवटी पराभव पत्करावा लागला.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत अहिल्यानगर, रत्नागिरी, पुणे ग्रामीण संघ बाद फेरीत दाखल

**बारामती : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथे सुरू असलेल्या २३व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक स्पर्धेत पुरुष विभागात अहिल्यानगर, तर महिला विभागात रत्नागिरी आणि पुणे ग्रामीण या संघांनी बाद फेरीत धडक मारली आहे.

वरिष्ठ पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात पुरुष विभागात ब गटात झालेल्या सामन्यात अहिल्यानगर संघाने वाशीम संघावर ३८-२१ असा विजय मिळवित बाद फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला अहिल्यानगर संघाकडे २९-९ अशी आघाडी होती. या संघाच्या राहुल धनावडे व आशिष यादव यांनी आक्रमक खेळ करीत विजय सोपा केला. सौरभ राऊत याने चांगल्या पकडी केल्या. वाशिम संघाच्या शेख अब्दुल शेख गुलाब याने काहीसा प्रतिकार केला, तर रघुनाथ पाटोळ याने पकडी घेतल्या.



पुणे ग्रामीण संघाने अमरावती संघावर ४६-२६ असा विजय मिळवित बाद फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे ३२-१२ अशी २० गुणांची आघाडी होती. पुणे संघाच्या अजित चौहान व शुभम शेळके यांनी चौफेर हल्ला चढवित अमरावतीच्या संघाला प्रतिकार करण्याची संधी दिली नाही. अनुज गावडे व ओमकार लालगे यांनी चांगल्या पकडी घेत विजय सोपा केला. अमरावतीच्या अभिषेक पवार व ऋषिकेश तीवाडे यांनी कडवट प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, तर सोमेश अजबले व राजा बेढेकर यांनी काही चांगल्या पकडी केल्या.

महिलांमध्ये ब गटात रत्नागिरी संघाने अमरावती संघावर ५३-६ असा दणदणीत विजय मिळविला. मध्यंतराला रत्नागिरी संघाकडे ३६-५ अशी निर्णायक आघाडी होती. रत्नागिरीच्या समरिन बुरोंडकर, सिद्धी चाळके यांनी चांगला खेळ केला. अमरावतीच्या संघाला मात्र या सामन्यात कोणतीही चमक दाखविता आली नाही. मध्यंतरानंतर अमरावती संघाने केवळ एकच गुणाची कमाई केली.

अ गटात पुणे ग्रामीण संघाने नागपूर संघावर ५०-२२ अशी मात करीत बाद फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे ३०-१० अशी आघाडी होती. पुण्याच्या किशोरी गोडसे हिने चौफेर चढाया करीत चांगला खेळ केला, तर वैभवी जाधव, मनशी बनसुडे, सलोनी गजमल यांनी चांगल्या पकडी घेतल्या. नागपूर शहरच्या ईश्वरी मूळणकर हिने चांगल्या चढाया केल्या आणि पूनम शाह हिने पकडी केल्या.



**पनवेल : पंचायत समितीच्या माजी सदस्य तथा गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच रत्नप्रभा घरत यांनी वाढदिवसानिमित्त शनिवारी सकाळी बंधू माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी अरुण घरत, अंकित घरत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, प्रतिभा भोईर, वर्षा नाईक, शिल्पा म्हात्रे, समिना साठी, सपना पाटील, लीना पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी रत्नप्रभा घरत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**





## पंतने नाकारले ‘रणजी’चे नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रणजी चषक स्पर्धा २०२४-२५ची दुसरी फेरी २३ जानेवारीपासून सुरू होणार आहे, ज्यामध्ये टीम इंडियाचे अनेक स्टार खेळाडू त्यांच्या राज्य संघाकडून खेळताना दिसणार आहेत. यामध्ये एक नाव समाविष्ट आहे ते म्हणजे स्टार यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतचे, जो राजकोटच्या मैदानावर सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात दिल्ली संघाकडून खेळणार आहे. दरम्यान, पंतला दिल्ली रणजी संघाच्या कर्णधारपदाची ऑफरही देण्यात आली होती, मात्र त्याने ही ऑफर नाकारली.

पंत २०१८नंतर प्रथमच रणजी ट्रॉफीमध्ये सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे, पण त्याने नेतृत्व करण्यास नकार दिला आहे.



**पनवेल : भाजप पुरस्कृत जय गणेश्वर क्रिकेट संघाच्या वतीने धानसर येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी आयोजक सुरेश पोरजी व जितेंद्र पोरजी यांनी त्यांचे स्वागत केले.**

# विराट-अनुष्काचा अलिबागच्या बंगल्यात गृहप्रवेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्रिकेटपटू विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा यांच्या अलिबाग येथील बंगल्याची गृहप्रवेश पूजा पार पडली. झिराड गावातील आवास वेलनेस प्रकल्पात विराट आणि अनुष्काचे आलिशान घर आहे.

गेल्या आठवड्यापासून विराट आणि अनुष्का यांच्या अलिबागमधील फेऱ्या वाढल्या होत्या. दोघेही गृहप्रवेशाची तयारी करत होते. गुरुवारी मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थित ही पूजा झाली. २०२२मध्ये विराट आणि अनुष्का यांनी या घराची खरेदी केली होती. अलिबाग येथील दुय्यम निबंधक कार्यालयात या खरेदीखताची नोंदणी झाली होती. त्या वेळी या आलिशान बंगल्याची किंमत सहा कोटी रुपयांची नमूद करण्यात आले होते, ज्यासाठी ३६ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क त्यांनी भरले होते. बंगल्यासोबत आठ एकर जागाही खरेदी केली होती, ज्याची किंमत १९ कोटी २४ लाख होती. यासाठी एक कोटी १५ लाख रुपयांचा



मुद्रांक शुल्क भरला होता. या दोन्हीचे आजचे बाजारमूल्य ३२ कोटींच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे. यात दोन हजार चौरस फुटाचा बंगला, बगीचा आणि ४०० चौरस फुटाच्या स्विमिंग पूलाचा समावेश आहे.

कोरोनाच्या टाळेबंदी काळात विराट आणि अनुष्का अलिबाग येथे निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या एका बंगल्यात वास्तव्याला राहिले होते. त्यामुळे हा परिसर त्यांना चांगलाच आवडला. यानंतरच त्यांनी अलिबाग परिसरात बंगला खरेदीचा निर्णय घेतला. विराटने जागा निश्चित केल्यानंतर त्याचा लहान भाऊ विकास याने प्राधिकारपत्र (पॉवर ऑफ ॲटोर्नी) व्दारे जागा खरेदी केली होती. वीकेण्ड होम म्हणून दोघांनी या बंगल्याची खरेदी केली असली तरी आगामी काळात दोघेही इथेच वास्तव्याला येण्याची शक्यता आहे.

याच प्रकल्पात अभिनेता राम कपूर, उद्योजिका रिटा कपूर, एक्सिस बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ चौधरी, प्रसिद्ध लेखिका शोभा डे यांनीही घरे खरेदी केली आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com